|| जय माता जी ||

|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ५१ सोमवार दि. १३ डिसेंबर २०२१ ते रविवार दि. १९ डिसेंबर २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

वेगळे झाले तरी त्यांच्यातील वाद वाढला चिडलेल्या पतीनेच पत्नीचा काटा काढला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

पती-पत्नी मध्ये एकदाका वितुष्ट आले आणि दोघांनी वेगळ व्हायचा निर्णय घेतला कि त्यांच्यात मुले आणि संपत्तीवरून वाद सुरु होतो आणि असे वाद जीवघेणे ठरतात. कारण अगोदरच संसार तुटल्याचा राग मनात असतो, त्या रागाला संपत्तीचा वाद आणखी खतपाणी घालतो आणि मग दोघंही एकमेकांच्या जीवावर उठतात. पुण्यात राहणाऱ्या अनिल आणि पुजामध्ये वाद होऊन त्यांचा संसार तुटला आणि दोघे वेगळे राहू लागले. पण दोघांच्या ...पान २ वर

'सैराट' ऑनर किलिंगची विकृती वाढली बहिणीचे शिर कापून भावाने सेल्फी काढली

आरोपी आई शोभा मोटे व भाऊ संकेत मोटे

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

सुडाने पेटलेला माणूस कधी कधी इतका विकृत बनतो कि आपण माणूस आहोत त्यामुळे आपल्या किंवा आपल्या कुटुंबाच्या बाबतीत काहीजरी चुकीच घडल तरी आपल्याला जनावरासारख वागता येत नाही याचाही त्याला विसर पडतो. माणसात आणि जनावरांमध्ये फरक आहे. माणूस हा साक्षर आहे, संस्कारी आहे आणि मुख्य म्हणजे पृथ्वीवरील इतर प्राण्यांपेक्षा तो बुद्धिमान आहे. समाज समूहात राहताना समाजाने जी कायद्याची चौकट आणि मर्यादांची रेषा आखून दिली आहे त्याच्या बाहेर माणसाला जाता येत नाही. पण असे असतानाही माणूस जेंव्हा सुडाच्या आगीत जळत असतो तेंव्हा त्याच्या डोक्यात निर्माण झालेली संतापाची सनक त्याला नाती गोती समाज कायदा सारे काही विसरायला लावते आणि म्हणूनच तो पशुसारखा वागतो आणि अशाच संतापलेल्या लोकांच्या हातून ऑनर किलिंग सारख्या घटना घडतात. यात रक्ताच्या नात्यातच रक्ताचे पाट वाहतात आणि त्यात एखाद्या जिवंत माणसाचाच नाही, तर माणूसकीचाही मुडदा पडतो. वैजापूर तालुक्यातील गोयेगावच्या लाडगाव शिवारात अशीच एक भयंकर आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. बहिणीने आई वडिलांच्या मनाविरुद्ध प्रेमविवाह केला म्हणून चिडलेल्या एका भावाने बहिणीच्या सासरी जावून आपल्या आईच्या मदतीने बहिणीची निर्घुण हत्या केली. यावेळी त्याच्यात साक्षात सैतान संचारला होता. कारण बहिणीचे शीर कापून तो बाहेर आला आणि त्या शिरासोबत त्याने सेल्फी घेतली आणि बघा अखेर तिला मी कसे संपवले असे मोठमोठ्याने ओरडून सांगू लागला. त्यानंतर आपल्या आईसह पोलीस ठाण्यात जाऊन त्याने स्वतःच आपल्या भयानक आणि तितक्याच अमानवी कृत्याची कबुली दिली.

अंगावर शहरे आणणाऱ्या या भयंकर घटनेने गावकरी आणि पोलीस सुद्धा हादरून गेले आहेत. जाती पतीच्या दुष्टचक्रात गुरफटलेला माणूस कोणत्या ठरला जाऊ शकतो याचेच हे भयंकर उदाहरण आहे. सैराट चित्रपटात दाखवलेल्या ओनर किलिंग सारख्याच या घटनेने पुरोगामी पुरोगामी महाराष्ट्राच्या धवल प्रतिमेला कलंकित केले आहे. या भयानक घटनेचा साक्षीदार असलेल्या त्या दुर्दैवी विवाहितेच्या पतीने या घटनेची माहिती देताना सांगितले कि, औरंगाबादच्या वैजापूर तालुक्यातील किर्ती मोटे हत्याकांडाने सगळा महाराष्ट्र हादरला आहे. ही ऑनर किलिंगची घटना प्रचंड भयंकर असल्याचं आता समोर आलं आहे. किर्ती उर्फ किशोरीने सहा महिन्यांपूर्वी पळून जाऊन लग्न केलं होतं. या गोष्टीचा राग मनात धरुन मुलीच्या आईने आणि अल्पवयीन भावाने अत्यंत निर्घृण प्रकारे तिची हत्या केली. दरम्यान, आता या संपूर्ण प्रकरणी किर्तीचा पती अविनाश थोरे याने त्या दिवशी नेमकी काय घटना घडली हे जसंच्या तसं सांगितलं आहे.

'त्या दिवशी माझी तब्येत खराब होती.. आम्ही दोघं ना वावरात कांदे खुरपत होतो. तर मी तिला ...पान २ वर

वहिनीशी संबंध ठेवणे महागात पडले बाप बेट्याने त्याला कुऱ्हाडीने तोडले

आरोपी अमोल

आरोपी आनंदराव

सांगली/क्राईम रिपोर्टर

नात्यातील अनैतिक संबंध जेंव्हा उघडकीस येतात आणि त्याचा गावभर बोभाटा होतो. तेंव्हा त्या घरातील पुरुष मंडळींना गावात तोंड दाखवायला जागा उरत नाही आणि म्हणूनच काही लोक संतापाच्या भरात टोकाचा निर्णय घेतात. सांगली जिल्ह्याच्या येलूरमध्ये एका विवाहितेचे तिच्या चुलत दिराशी अनैतिक संबंध होते. याची माहिती तिच्या पतीला आणि सासऱ्याला लागताच सुरुवातीला त्या दोघांना समजावण्याचा प्रयत्न झाला. मात्र तरीही संबंध सुरूच राहिल्याने बाप बेट्यांनी मिळून आपल्याच नात्यातील त्या तरुणाची निर्घुण हत्या केली. प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

सांगली जिल्हयातील वाळवा तालुका हा सधन तालुका म्हणून परिचित आहे. वाळवा तालुक्या तील येलूर हे गाव तसे पाटलांचे सधन गाव म्हणून ओळखले जाते. पाटील लोकांची ऊसाची शेती असल्याने त्याचेकडे बारमाही पैसा हा असतोच. गावातील आनंदराव पाटील यांची ही ऊसाची शेती असल्याने गावात त्याचा रूबाबही भारी होता. त्यानी गेल्या पाच सहा वर्षापूर्वी आपला मुलगा अमोल याचा विवाह कांचन (काल्पनिक नाव) हिच्याशी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे केला होता. कांचन ही दिसायला देखणी आणि सालस होते. तिच्या गाली गोड हास्य असल्याने ती आपल्या हसतमुख स्वभावाने आणि सहजपणे कुणाशी मनमोकळेपणाने बोलत होती. ती ही चांगल्या घरातील असल्याने तिच्यावर ही चांगले ही संस्कार झाले होते. कांचनच्या प्रेमात तिचा नवरा अमोल हा गुरफटून गेला होता. त्या दोघांना ही लग्नानंतर दोन अपत्ये झाली. तसा त्याचा संसार मार्गस्थ आणि व्यवस्थीत चालु होता. अमोल याचा चुलत भाऊ रणजित पाटील हा सारखा अमोल याच्या घरी येत होता. काचंन हिला तो वहिनी ...पान २ वर

राजाच्या एन्काऊंटरचा डाव भारी पडला अठरा पोलिसांना अखेर तुरुंगवास घडला

गुन्हेकथा/लक्ष्मणराव पाटोळे

सातवेळा निवडून आलेला अपक्ष आमदार आणि राज्याचा मुख्यमंत्री यांच्यात संघर्ष निर्माण झाला तर आपण कोणाची बाजू घ्यावी, असा प्रश्न पोलिसांना पडेल काय? अर्थातच नाही! आमदार कितीही वेळा निवडून आलेला का असेना, पोलीस यंत्रणा ही मुख्यमंत्र्यांच्याच कलाने चालणार! पण समजा, सातवेळा निवडून आलेला आमदार हा एखाद्या संस्थानाचा संस्थानिक असेल तर? अशावेळी पोलिसांवर किती मोठा दबाव येत असेल, याची कल्पनाच केलेली बरी! १९८५ साली राजस्थानातील डिग जिल्हा पोलीस उपअधीक्षकांवरही असाच दबाव आला होता. पण हा दबाव शांतपणाने हाताळणे त्यांना जमले नाही आणि दबावाला बळी पडलेल्या उपअधीक्षक महाशयांच्या हातून संस्थानिकाचे चक्क एन्काऊण्टर घडले!

राजस्थान ही भूतपूर्व राजा-महाराजांची भूमी. ...पान २ वर

किती दिवस भीत भीत जगायचे भाईला दहशत संपवण्यासाठी भाईचा गेम केला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

मयत वसीम पठाण व उमेश येरमे

जी माणसे शस्त्राच्या धाकावर दादागिरी करीत जगतात त्यांचा मृत्यूही शेवटी शस्त्रानेच होतो. पण अशा माणसाच्या नादाने कधी कधी निरअपधाचाही जीव जातो. दादागिरीच्या जोरावर दारूचा धंदा करून लोकांना त्रास देणाऱ्या वसीम पठाणचे सुद्धा तसेच झाले आणि तो एका मटन विक्रेत्याच्या हातून मारला गेला. वसिम पठाण हा नेहमीच त्या मटण विक्रेत्याला ठार मारण्याची धमकी देऊन फुकट मटण न्यायचा. त्यामुळे मटणवाला भीतीच्या छायेत होता. अखेर त्याने हि भीती कायमची नष्ट करण्यासाठी रोज धमकावणाऱ्या वसीम पठाण याचाच गेम करण्याचे ठरवले आणि त्याला दारूची पार्टी देऊन आपल्या साथीदारांच्या मदतीने त्याचा गेम केला. मात्र यात वसीमचा एक मित्र मात्र फुकटचा मारला गेला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

अब्दुल रहेमान हा मटण विक्रीच्या व्यवसायातून त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवत होता. या व्यवसायाच्या माध्यमातून वसीम पठाण या तरुणासोबत ओळख झाली होती. चोरुन लपून दारु विकणे आणि परिसरात फावल्या वेळेत दहशत ...पान ६ वर

गुंडाच्या पत्नीचा विनयभंग केला स्त्रीलंपट गणप्या जीवानिशी गेला

नंदुरबार/क्राईम रिपोर्टर

पो.अधिक्षक पाटील

घरची इज्जत सर्वांनाच प्यारी असते. अशावेळी कुटुंबातील कुठल्या स्त्रीवर जर कुणी वाईट नजर ठेवली तर त्या कुटुंबातील पुरुष गप्प बसत नाहीत. शनिमांडळ या गावातही असेच घडले. एका इसमाने चक्क गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमाच्या पत्नीचा तिच्या घरात घुसून विनयभंग केला. त्यामुळे तो इतका चिडला कि त्याने आपल्या मुलाच्या मदतीने त्याने पत्नीचा विनयभंग करणाऱ्याची हत्या केली आणि मृतदेह अगोदर तलावात फेकला आणि बिंग फुटू नये म्हणून तलावातून बाहेर काढून विहिरीत फेकला. मात्र तरीही तो पकडला गेला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ या गावात संजय राजेंद्र मोरे (पाटील) हा तरूण रहात होता. त्याला गावात गंप्या म्हणून संबोधले जात होते. याच गावात संजय रामभाऊ पाटील हादेखील रहात होता. हा माणूस गुन्हेगारी प्रवृत्तीचा होता. खुनशी स्वभावाच्या संजयवर खुनाचा एक गुन्हा दाखल आहे. आता या गुंडाच्या नादाला कुणी लागेल का? याचे उत्तर नाही असेच असणार. परंतु गंप्याच्या मनात वेगळाच खेळ सुरु झाला होता. त्याला संजय ...पान ६ वर

रक्ताचे नाते इथे रक्तरंजित झाले माथेफिरू भावाने बहिणीला ठार केले

उल्हासनगर/किरण तेलगोटे

मयत अरूणा

बहिण भावांमधील वाद काही नवा नाही. अगदी लहानपणापासून एकत्र वाढलेले असल्याने कधी खाऊ वरून तर कधी खेळण्यावरून बहिण भावांमध्ये वाद होताच असतात. पण जसजसी भावंडे मोठी होत जातात. तसतसा त्यांच्यात समजूतदारपणा येऊ लागतो. नात्याचे अर्थ आणि आपुलकी कशी जपायची याची समाज येते. भाऊ मोठा असेल तर बहिणीच्या प्रती आपली काय जबाबदारी आहे हे ओळखूनच तो वागत असतो. तर बहिण मोठी असल्यास भावाचा अभ्यास घेण्यापासून त्याला शिस्त लावण्यापर्यंत सगळी जबाबदारी तिच्यावर येते. थोडक्यात बहिण भावाचे नाते हे जितके अतूट मायेचे असते तितकेच ते जबाबदारीचेही असते.

उल्हासनगरमध्ये एका भावाने याच नात्याला बहिणीच्या रक्ताने रक्तरंजित केले. बहिण टीव्हीवर जास्त सिनेमा बघते याचा राग मनात धरून एका भावाने आपल्या बहिणीची निर्घुण हत्या केली. विशेष म्हणजे याने सहा वर्षापूर्वी त्याच्या पत्नीचीही हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांनी या खुनी भावाला अटक केली आहे. उल्हासनगरात निर्दयी भावानेच बहिणीची हत्या केल्याची घटना घडली आहे. दोन दिवसांपासून बहिणीचा मृतदेह घरातच पडून असल्याने मृतदेहाची दुर्गंधी पसरली होती. त्यानंतर इमारतीतल्या रहिवाशांनी ...पान २ वर

प्रियकरावर बलात्काराची केस टाकून फसली ब्लॅकमेलर प्रेयसी आपला जीव गमावून बसली

तासगाव/क्राईम रिपोर्टर

विधवा किंवा नवऱ्याने सोडलेली बाई कामधंदा करून पोट भरू शकते. पण त्याच्याही पलीकडे तिच्या काही गरजा असतात. त्यातील एक गरज असते शरीर सुखाची ते जर तिला मिळाले नाही तर तिचा तोल जातो आणि मग त्या सुखासाठी ती कुणालाही जवळ करते. अशा माणसाकडून तिला पैसा आणि शरीर सुख दोन्ही मिळत असतं. दारुड्या नवऱ्याला सोडून आष्ट येथे माहेरी राहणाऱ्या निर्मलाने योगेश बरोबर संबंध जुळवले. तो तिला पैसा आणि शरीर सुख दोन्ही देत होता. मात्र त्याच्याकडून पैसा येणे बंद झाले तशी ती त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करू लागली. इतकेच नाही तर त्याच्यावर बलात्काराची केस टाकली. ती केस मागे घेण्यासाठी तो विनवणी करीत होता, पण ती ऐकत नव्हती. अखेर त्याने तिला ठार मारून कायमची आपल्या मागची कटकट दूर केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केलीय.

तासगाव तुक्यातील वासुंबे येथील निर्मलाचा विवाह आष्टा येथील अजय उर्फ खंडू चव्हाण याच्याशी समाजाच्या रितीरिवाजानुसार गेल्या दहा वर्षापूर्वी झाला होता.निसर्ग नियमाप्रमाणे या दामत्यांना दोन मुले झाली.त्याचा संसार बहरत फुलत असताना नवरा बायकोत कोणत्या ना कोणत्या कारणातून दररोज भांडणे होऊ लागली होती. तो तिच्या ...पान ६ वर

चोराचा पाठलाग करताना अंदाज फसला मोबाईलसाठी स्वतःचा जीव गमावून बसला

नवी मुंबई/एस.कुमार

आजकाल मोबाईल हा प्रत्येक माणसासाठी जीवनावश्यक वस्तू बनलेला आहे. अगदी लहान मुलापासून ते साठी ओलांडलेल्या माणसापर्यंत सर्वांनाच मोबाईलचे आकर्षण आहे. मोबाईलची उपयुक्तता इतकी वाढलीय कि मोठ्या व्यावसायीकापासून कचरा गोळा करणाऱ्यांपर्यंत सर्वांच्या हाती मोबाईल दिसू लागलाय. पण हाच मोबाईल कधी कधी जीवघेणा ठरतोय. मोबाईलच्या हट्टापाई काही मुलांनी आत्महत्या केल्या आहेत, तर मोबाईलच्या रागातून हत्या सुद्धा झाल्यात. मानखुर्द येथे मोबाईल चोरशी दोन हात करताना एका निरपराध तरुणाला जीव गमवावा लागलाय. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

२० नोव्हेंबर २०२१. नवी मुंबईतील वाशी लोहमार्ग पोलीस ठाणे. सकाळचे पाच वाजलेले. ठाणे अंमलदार पीएसआय आबासाहेब भिंगारदिवे व त्यांचे सहकारी एका गुन्ह्याची चर्चा करीत बसले होते. इतक्यात फोनची घंटा वाजत. बोलत बोलतच पीएसआय भिंगारदिवे फोन उचलतात, तोच पलीकडून जयहिंद, सर मी पोलीस ...पान ६ वर

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:12 PM Page 1

पान १ वरून....

'सैराट' ऑनर किलिंगची विकृती ...

म्हटलं की, मी घरी जातो माझी तब्येत काही बरी नाही. मी घरी जाऊन झोपतो.. तुला जोपर्यंत काम करायचंय तोपर्यंत कर.. नंतर घरी निघून ये. मग मी घरी येऊन झोपलो. थोड्या वेळाने मला घरात कुणीतरी आल्यासारखं वाटलं.' 'मी झोपेतच होतो... तर ती म्हणाली की, मम्मी आणि दादा आले. मला असं वाटलं की, त्या दिवशी तिची मम्मी येऊन गेली होती.. म्हटलं सगळं व्यवस्थित होतं.. मला वाटलं प्रेमाने आले असतील. त्यामुळे मला वाटलं गप्पा मारतील, चहा घेतील आणि जातील. काही वेळाने ती चहा ठेवण्यासाठी किचनमध्ये गेली ते पण किचनमध्ये गेले.' 'थोड्या वेळाने मला डब्बे पडल्यासारखा आवाज आला. म्हणून मी बघायला गेलो. मला वाटलं की, ती खुर्चीवरून वैगरे पडली की काय. मी आत पाहिलं तेव्हा तिच्या मम्मीने तिचे पाय पकडले होते आणि भाऊ कोयत्याने वार करत होता.' 'मी स्वंयपाकघरात पोहचेपर्यंत तिला तोडलंच होतं. तरी पण मी पुढे गेलो. त्याने माझ्यावर कोयता उगारला. त्यामुळे मी पटकन बाहेर आलो. बाहेर आल्यावर मी माझ्या काकीला हाक मारली. माझा आवाज ऐकून काकीही बाहेर आली. तोपर्यंत तिचं मुंडकं घेऊन बाहेर आला व्हरांड्यावर.. त्याने मोबाइल काढून मोबाइलमध्ये सेल्फी घेतली नंतर ते खाली ठेवून दिलं.' 'नंतर त्याची आई त्याला म्हणाली की, आतमधून कोयता घेऊन ये. मग तो आत गेला आणि त्याने आत जाऊन कोयता आणला आणि मग ते निघून गेले. या संपूर्ण घटनेनंतर पोलीस तासाभराने आले इथे.' 'आम्ही इथून बसमध्ये सोबत जायचो कॉलेजला. त्यावेळी आम्ही एकमेकांशी बरंच बोलायचो. कधी-कधी ती तिची मोटर बाइक देखील घेऊन यायची कॉलेजला. ती दोन महिन्याची गर्भवती पण होती.' '२१ जूनला आमचं लग्न झालं होतं आळंदीला. त्यानंतर जवळजवळ १ महिना आम्ही बाहेरच होतं. एक महिन्याने आम्ही घरी परत आलो. माझ्या घरातल्या लोकांना या लग्नाबाबत काहीही आक्षेप नव्हता.' भयंकर! आईने पकडून ठेवलं अन..; धडावेगळं केलेलं शीर घेऊन भाऊ लोकांना म्हणाला 'पाहा, हिचं काय केलं' 'पण मुलीच्या कुटुंबीयांना असं वाटलं की, मुलीने पळून लग्न केल्याने त्यांची इज्जत गेली म्हणून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं. आम्ही एकाच समाजातील होतो. पण आता त्यांच्या मनात काय होतं हे त्यांचं त्यांनाच माहित.' 'आम्ही जवळजवळ २.५ वर्ष रिलेशनमध्ये होतो. त्यानंतर आम्ही ठरवलं की, लग्न करुयात. जेव्हा आम्ही लग्न करायचं ठरवलं होतं तेव्हा मी तिला आधीच सांगितलं होतं की, घरातून काहीही घेऊन यायचं नाही. तू फक्त एकटी ये.' 'ती बारावीपर्यंत शिकली होती. कारण तिच्या घरच्यांना माहित पडलं होतं आमच्या अफेअरबाबत. त्यामुळे तिच्या घरच्यांनी तिचं कॉलेजला जाणं बंद करुन टाकलं होतं. त्यामुळे लग्नाबाबत आम्ही काही तिच्या कुटुंबीयांना विचारलं नाही. कारण विचारलं असतं तरीही त्यांनी नकारच दिला असता हे मला माहिती होतं.' 'आम्ही दोघे गावात जेव्हा लग्न करुन परतलो होतो. त्यानंतर अनेक महिने ते लोकं आमच्याशी एकही शब्द बोलले नाही. फक्त आता आठ दिवसांपूर्वी तिची आई इथे येऊन गेली होती. तेव्हा तिने माझ्या बायकोशी प्रेमाने संवाद साधला होता. तेव्हा ती म्हणाली होती, मुली आता सगळं ठीक झालं आहे. बाबा तुला काहीही बोलणार नाही. आता घरी आलीस तरी चालेल. असं ती बोलून गेली होती.' 'दरम्यान, घटनेच्या दिवशी तिच्या आईने माझ्या बायकोला फोन केला आणि असं म्हटलं की, 'मी तुझ्यासाठी तूप आणलं आहे. तू इकडे मळ्यात ये.' पण मी तिला जाऊ दिलं नाही. त्यामुळे तिची आई आणि भाऊ हे थेट आमच्या घरी आले.' असा सगळा घटनाक्रम किर्तीचा पती अविनाश थोरे याने सांगितला. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी कैलास प्रजापती, वीरगावचे सहायक पोलिस निरीक्षक विजय नरवडे यांच्यासह पोलिस पथकाने धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास करीत असल्याचे समजते.

वेगळे झाले तरी त्यांच्यातील वाद वाढला...

नावावर असलेल्या फ्लॅटवरून त्यांच्यातला वाद वाढला. अनिलला फ्लॅट विकायचा होता तर ती विकायला देत नव्हती. अखेर त्याने आपल्या मित्रांच्या मदतीने डोकेदुखी ठरलेल्या पत्नीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे. दारव्हा तालुक्यातील शेलोंडी येथील अनिल रमेश कावळे याचा विवाह गेल्या आठ वर्षापूर्वी मनोरा तालुक्यातील वाईगौळ येथील पुजाशी झाला होता.पुजा ही दिसायला सुंदर आणि देखणी होती. अनिलचे तिच्यावर मनापासून प्रेम होते. तो ही पुण्याला एका कंपनीत नोकरी करत होता. लग्नानंतर एका वर्षातच त्याना मुलगा झाला. मुलगा झाल्याने त्याच्याबरोबर त्याच्या आई वडिलांना ही आनंद झाला. मुलाच्या कौडकौतुकात दिवस जात होते. मुलगा आता पाच सहा वर्षाचा झाला होता. लग्नांनंतर पत्नी मुलासह पुण्याला राहण्याचा विचार अनिल याने केला होता. त्याने तसे आपल्या घरच्या लोकांना ही सांगितले होते. त्यांनी ही त्याच्या या प्रस्तावाला मान्यता दिली होती. अनिल हा पुण्यात नोकरी करीत असल्याने त्याने पुण्यातच नोकरी करत असलेल्या ठिकाणीच जवळच एक प्लॅट खरेदी केला. तो प्लॅट त्याने आपल्या आणि पत्नी पुजा दोघांच्या नावाने केला. पती पत्नीचा नवा संसार बहरत फुलत होता. त्या संसारावर मुलाच्या रूपाने फुल ही उमलल्याने त्याच्या आनंदाला पारावर राहीला नाही. पुजा ही आता नवरा अनिलबरोबर पुण्याला त्यांनी खरेदी केलेल्या प्लॅटमध्ये येवून राहू लागली होती. दिवस असेच जात होते अलिकडे मात्र अनिलला पुजाच्या वागण्यात आणि राहणीमानात बराच फरक जाणवत होता. ती दिवसभर कोणाशी तरी फोनवरून बोलत असायची. नेमकी हिच गोष्ट त्याला खटकत होती. त्यातून त्या दोघा नवरा बायकोत दररोज भांडणे होऊ लागली. तिचा स्वभाव ही भांडखोर आणि रागीट असल्याने ती ही त्याला त्या भांडणात जशास तसे उत्तर देऊ लागली होती.याचा राग त्याला येवू लागला होता. आपली बायको बाहेरख्याली पणे वागून कोणाच्या तरी नादाला लागली आहे याचा संशय अनिल याला येत होता. तसे त्याने तिला बोलून ही दाखविले होते नवरा आपल्यावर संशय घेत आहे, हे तिने ओळखले होते. त्यातूनच तिने सती सावित्रीचा आव आणत तुम्ही माझ्यावर विनाकारण संशय घेऊन मला शारीरिक व मानसिक त्रास देत आहात असे सांगून नवऱ्याच्या या संशयाचे भांडवल करीत तिने नवऱ्याच्या वागण्याचे आणि संशय वृत्तीने आपल्याला त्रास होत असल्याचे आपल्या माहेरी आई वडिलांना सांगितले.त्यांनी ही जावाई अनिल याला समाजावून सांगत चार शहाणपणाच्या गोष्टी त्याला सांगितल्या होत्या. बायको नीट वागत नाही, तिचा बाहेरख्याली स्वभाव ती बंद करीत नाही उलट तिच्या माहेरचे लोक आपल्या वरच बोट ठेवतात याचा त्याला राग आला. तो आता तर जास्तच तिच्याबरोबर भांडण काढू लागला. हे भांडण इतके विकोपाला गेले की पुजाने त्याच्याकडे सरळ सरळ घटस्फोट मागितला. त्यामुळे त्याने ही चिडून तुला घटस्फोट देतो म्हणत दारव्हा कोर्टात दोघांनी ही घटस्फोटासाठी अर्ज केला. आता ती त्याच्यापासून वेगळे राहण्यासाठी आपल्या माहेरी मनोरा तालुक्यातील वाईगौळ येथे आपल्या आई वडिलाच्याकडे दिवाळीला निघून आली. पती पत्नीच्या नात्यात संशयाने वितुष्ट आणले होते. बायको माहेरी निघून गेली तरी मुलग्याला अनिल याने आपल्याकडेच ठेवून घेतले होते. मुलाचा ताबा त्याने तिच्याकडे दिला नव्हता.मुलाचा ताबा आपल्याला मिळावा म्हणून परत पुजाने कोर्टात अर्ज केला होता. त्यामुळे हे प्रकरण ताणले गेले होते संसार तुटण्याच्या मार्गावर आला आहे हे ओळखून अनिल याने पुण्यात घेतलेला प्लॅट विकण्याचा निर्णय घेतला. पण तो प्लॅट दोघाच्या नावावर असल्याने पुजाची ही संमती आवश्क होती. ती समंती पुजा ही देत नव्हती. प्लॅट विकायला ती तयार नव्हती. त्याला तो प्लॅट विकून आपल्या गावी शेलोंडी येथे यायचे होते. संसार कसा तरी तुटलाच होता. विनाकारण या ना त्या कारणातून पुजा ही त्याला कोर्टाच्या माध्यामातून त्रास देत होती. एक तरी पुजा प्लॅट विकण्यासाठी एनओसी ही देत नव्हती. उलट कोर्टातून नवऱ्याला त्रास ही देत होती. तिचे वागणेच त्याला खटकत होते. आता मात्र अनिलने वेगळाच विचार केला होता. पुजा ही चांगली वागत नाही, तिचा स्वभाव हा बाहेरख्याली आहे. तरी ही तिचेच म्हणणे सासरचे लोक खरे धरून आपल्याला त्रास देत आहेत याचा त्याने सारासार विचार करून पुजा बरोबर आपला मित्र उज्जवल नगराळे याला मैत्री करायला लावली. उज्जवल हा अनिलचा चांगला जवळचा मित्र होता. त्याला ही त्या दोघाचे प्रकरण माहित होते. त्या दोघांनी घटस्फोटासाठी कोर्टात अर्ज ही दाखल केला आहे हे ही त्याला माहित होते. अनिलने मात्र पुजाशी त्याला मैत्री एवढया साठी करायला लावली होती की ती त्याच्या नादाला लागते की नाही हे त्याला बघायचे होते. त्यातून त्याने उज्जवल याला पुजाशी मैत्री करण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे उज्जवलने पुजाच्या मोबाईल फेसबुकवरती फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली ती फ्रेड रिक्वेस्ट पुजाने स्विकारल्यावर त्या दोघात बोलणे होऊ लागले होते. हळू हळू त्या दोघात मैत्री ही वाढली, ते दोघे ही सोशल मिडियावर चॅटिग ही करू लागले. उज्जवल बोलावेल तेथे पुजा येवू लागली. त्या दोघांची मैत्री वाढल्याने अनिलने आता उज्जवलला पुजाला आपल्या मार्गातून बाजुला करायचे आहे. तु मला मदत करत असे सांगितले. उज्जवला यात काही गैर वाटले नाही.त्याला पुजाबरोबर मजा मारून सुख घ्यायचे असल्याने त्याने तसे केले ही, पुजा त्याच्या आता चांगलीच आहारी गेलेली होती. नवऱ्याने सोडलेली बाई दुसऱ्या पुरूषाच्या नादाला लागली की ती त्याचीच होते. तसेच पुजाचे ही झाले. पुजापासून विभक्त राहून अनिल काही सुखी नव्हता. उलट ती आपल्या माघारी आपल्या मित्राला चिकटून मजा मारते हे बघून त्याचा संशय खरा ठरला होता.ती बाहेरख्याली वागून आपल्याला त्रास देत होती. आणि नातेवाईक आपल्याला नावे ठेवत होते. याचा विचार करून त्याने कळंब येथील परत आपला दुसरा एक मित्र गौरव राऊत याला पुजाला संपविण्यासाठी मदत मागितली. आता अनिल, गौरव आणि उज्जवल या तिघांनी मिळून पुजाला संपविण्याचा घाट घातला. तसे तर पुजा ही उज्जवलच्या नादाला लागलेलीच होती. पुजाला घरातून बाहेर काढयाचे काम त्या दोघांनी उज्जवलवर सोपविले. त्यातच उज्जवलने पुण्याला तुझ्या नवऱ्याने तुला परत बोलवले आहे. तुझ्याकडे त्याचे प्रॉप्रटीचे काम आहे. पुण्यातील प्रॉप्रटी विकून तो तुला संपूर्ण रक्कम देईल त्या बदल्यात तु त्याचेवरची घटस्फोटाची केस मागे घ्यायचे असा निरोप तिला दिला. दिवाळीचा सण संपल्यावर एस.टीचा संप सुरू झाल्याने गाडया बंद होत्या. नेमके हेच ओळखून उज्जवलने पुजाला आपल्या कारमधून तिला पुण्याला सोडतो असे सांगितले. त्याप्रमाणे २० नोव्हेंबरच्या दिवशी वाईगौळ येथून पुजा दिग्रजच्या मनोरा चौकात आली. तेथे कार घेऊन उज्जवल हा तयार होता. त्याच्या कारमध्ये ती बसली. ते दोघे ही पुण्याला जात असताना सांवंगी ब्रुदक शेत शिवारात त्याने कार थांबविली. तेथे आधीच पुजाचा नवरा अनिल त्याचा मित्र गौरव हे होते. रात्रीचा अंधार पडला होता. तेथे त्या तिघांनी दारू ढोसली. त्यानंतर त्यांनी पुजाला कारमधून खाली उतरविले अनिल हा तिच्याबरोबर भांडण काढत होता.तुम्ही पुण्याला होता,मग येथे कसे म्हणत ती त्याच्याबरोबर भांडत होती.त्यातच तू माझ्याशी गैर वागतेस आणि उज्जवलच्या नादाला लागतेस असे म्हणत त्याने तिच्याकडे कोऱ्या स्टॅप पेपरवर सहया मागितल्या.तिचा गळा जोरात आवळून धरला.त्या सहया तिने देण्यास नकार दिल्यावर त्याने आपल्याकडील चाकूने तिच्या मानेवर,गळ्यावर,आणि पोटात धारदार पणे वार केले या कामात त्याला उज्जवलने आणि गौरवने ही मदत केली.धारदारपणे वार केले.त्यात तिचा जागीच मृत्यू झाला. तिचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तिचा मृतदेह तेथेच टाकून कारमधून पलायन केले.दुसऱ्या दिवशी सांवंगी येथील शेत शिवारात २५ वर्षीय महिलेचा मृतदेह पडला असल्याची माहिती दारव्हा पोलीसानां मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या महिलेची ओळख पटवून पोलीसांनी तपासाला सुरूवात केली.घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह त्यांनी शवविच्छेदनसाठी दारव्हा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.तांत्रीक दृष्ट्या या घटनेचा पोलीस तपास करीत असताना घटनेची एक एक कडी जुळवित होते.त्यातच पुजाच्या आई वडिलांनी जावाई अनिल कावळेवर आपला संशय व्यक्त केला होता. त्या दृष्टीने पोलीस मोबाईलचे कॉल डिटेल्स तपास करीत असताना घटनेच्यावेळी पुजाचे उज्जवल पंढरी नगराळे याच्याशी बोलणे झाल्याचे दिसत होते.त्याचप्रमाणे गौरव राऊत आणि अनिल कावळे याचे ही मोबाईल कॉलचे लोकेशन घटस्थळी दाखवत होते.पोलीसांनी लागलीच हालचाल करीत गौरव राऊत याला ताब्यात घेऊन त्याचे कडे पुजाच्या हत्येविषयी चौकशी करीत असताना त्याने आपला गुन्हा कबुल करीत घडलेली सगळी हकीकत पोलीसांना सांगितली. त्याने दिलेल्या माहितीनुसार पोलीसांनी या घटनेचा मुख्य सुत्रधार मयत पुजाचा नवरा अनिल कावळे याचे सह त्याचा मित्र उज्जवल नगराळे आणखी एक मित्र अभिषेक बबन म्हात्रे याला ही ताब्यात घेतले.त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला. पुजाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी पुजा अनिल कावळे (वय २७) हिचा खून करून पुरावा नष्ट करणेचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिचा नवरा अनिल रमेश कावळे (वय ३०) त्याचा मित्र गौरव रामभाऊ राऊत (वय २१) उज्जवल पंढरी नगराळे (वय २५) आणि अभिषेक बबन म्हात्रे (वय २३) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्या चौघांना २५ नोव्हेंबर पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली कार व धारदार चाकू जप्त केला. या घटनेचा तपास पो.निरी.सोनाजी अमले, स.पो.नि. विजय रत्नपारखी हे करत आहेत.

वहिनीशी संबंध ठेवणे महागात ...

म्हणून बोलवत होता. ती ही त्याला भावोजी म्हणून बोलवत होती. ती त्याच्याशी बोलत असताना हसत खिदळत बोलत होती. त्याच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारत होती. त्या दोघात दीर भावजेचे नाते होते. परंतू त्या दोघांतील नात्याताचा विसर त्याना पडला होता. रणजित हा तिला वहिनी वहिनी म्हणत कधी चिकटला आणि ती त्याच्या नादाला कधी लागली हे त्याचे त्याना कधी कळाले नाही. ते दोघे ही लगट करीत एकमेकाशी बोलत होते. अलिकडे तर रणजित हा कांचन हिच्या व्हॉटसॲपवर मेसेज पाठवित होता. ती ही त्याला रिप्लाय देत होती. त्या दोघांचे संबंध जुळत होते. याची कुणकुण कांचन हिचा पती अमोल याला लागली. तसे त्याने कांचन हिला रणजितपासून दूर राह असा सल्ला दिला.ती ही नवऱ्याचे ऐकून त्याच्यापासून दुर राहू लागली होती.पण रणजितला मात्र तिच्यावाचून करमत नव्हते.तो सारखा काही ना काही कारण काढून तिच्या घराकडे येत होता. तिच्याशी गप्पा मारत बसत होता. ही गोष्ट आता आनंदराव पाटील आणि अमोल पाटील याना खटकत होते.त्यांनी परत रणजित पाटील याला समजावून सांगत तू आमच्या घरी येवू नकोस अशी त्याला तकीद दिली. त्यावेळी ही रणजितने त्याचे ऐकून न ऐकल्यागत केले. त्यानंतर ही तो चोरून कांचन हिच्या संपर्कात राहत होता. तिच्याशी मोबाईलवरून चॅटिग करत होता. या गोष्टीवरून रणजितच्यात आणि अमोल याचेत सतत वादा वादी भांडणे होऊ लागली होती. अमोल याने तर या कारणातून पत्नीला तुझे त्याचेबरोबर बाहेरख्याली संबंध आहेत म्हणून भांडण व मारहाण करून तिच्या माहेरी पाठविले होते. याच कारणातून कांचन हिने देखील नवरा व सासरच्या लोका विरूध्द पोलीसात तक्रार दाखल केली होती. पोलीससासमोर देखील तिने आपले कोणाशी विवाहबाहय संबंध नाहीत हे कबुल केले. त्यानंतर अमोल याने तिला परत येलूर येथे आणले. दिवसामागून दिवस जात होते.थोडे दिवस असेच निघून गेल्यावर परत रणजित आणि तिच्यातील ते संबंध अमोल आणि त्याच्या घराच्या लोकांना दिसून आले. त्यावेळी कांचन हिने मोठया सफाईदारपणे त्यांना सांगितले की रणजित हा सारखा माझी छेड काढत असतो.तो तिला त्याच्याशी संबंध ठेवायला भाग पाडत आहे असा तिने आव आणला. यावरून अमोल आणि त्याचे वडिल आनंदराव पाटील यांनी रणजित बरोबर गेल्या महिन्यापूर्वी भांडण काढत त्याला मारहाण करीत कांचन हिच्या नादाला लागलास तर याद राख तुझा मुडदाच पाडतो अशी धमकी दिली होती. त्यावेळी रणजित याने कुरळप पोलीसात त्याला झालेल्या मारहाणीबद्दल अमोल पाटील आणि आनंदराव पाटील याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती.तर अमोल पाटील आणि आनंदराव पाटील यांनी ही त्याचे विरोधात कांचन हिला नादाला लावत तिची छेड काढत असल्याची तक्रार पोलीसात दाखल केली होती. त्यावेळी पोलीसांनी दोघानाही समजावून सांगत हे प्रकरण मिटवले होते. परंतू परत गावात आल्यावर रणजित पाटील आणि अमोल याचेत या कारणातून भांडणे झाली होती. रणजित पाटील याचेमुळे आपली, आपल्या घराची अब्रु इज्जत गेली आहे असे अमोल आणि त्याचे वडिल आनंदराव पाटील यांना वाटत होते. कांचन ही रणजित याच्या संपर्कात आहे याची ही त्याना खात्री पटली होती.आग दोन्हीकडे लागली तरच धुर निघतो हे त्याना ही माहित होते. त्यातच गावात ही आता अमोलच्या पत्नी विषयी उलट सुलट चर्चा ही होत होती.त्यातून त्या दोघांचे संबंध असल्याचेच पुढे येत होते. या गोष्टीचा राग बाप लेकांनी मनात ठेवला होता. पुतण्या रणजित हा आपल्या सुनेचा नाद सोडायला तयार नाही, तसेच सुन ही काही ऐकायला तयार नाही हे त्यांनी ओळखून आता यातून कायमचा सोक्ष मोक्ष लावायचाच असे मनाशी ठरविले तसे त्यानी मुलगा अमोल याला ही सांगितले.या कारणातून सारखी भांडणे होण्यापेक्षा एकदा काय ते प्रकरण निकालात काढले पाहिजे असा विचार अमोल आणि त्याच्या वडिलांनी केला.एक तर गावात रमेश याच्यामुळे इज्जत गेली आहे त्यालाच सपंवून टाकूया आणि हे प्रकरण मिटविले पाहिजे म्हणून ते रमेश याचेवर पाळत ठेवायला सुरूवात केली. त्याला कायमचे संपविणेसाठी तयारी केली.दीर भावेजेचे नाते असताना त्या दोघातील विवाहबाहय संबंधाच्या चर्चेने ते ही वैतागले होते. रणजित याला संपविण्यचा त्यांनी कट रचला. सोमवार दि.६ डिसेंबर रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर याची जंयती होती. गावात तसे वातावरण हे शांततेचे होते. सकाळी ११ च्या दरम्यान जंयतीचे कार्यक्रम आटोपून लोक आपआपल्या कामाला लागले होते. वारणा बाझारच्या चौकात तशी तुरळक गर्दी होती. त्याच दरम्यान तेथे रणजित पाटील हा ही आला होता. तेवढयात तेथे आनंदराव पाटील आणि त्याचा मुलगा अमोल पाटील हे दोघे आपल्या हातात कुऱ्हाड आणि कोयता घेऊन आले. त्यांनी वारणा बाझारच्या चौकात एकटा थांबलेल्या रणजित याला गाठून त्याचेवर आपल्याकडील कुऱ्हाडीने आणि कोयत्याने सपासप त्याचे मानेवर, डोक्यावर आणि शरीराच्या इतर भागावर वार केले. अचानक झालेल्या हल्ल्यायाने रणजित पाटील हा ओरडत किचांळत रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याच्या डोक्यातून आणि शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. कुणाला काही कळायच्या आत झालेल्या या प्रकाराने लोक ही भांबावून गेले. बाजुलाच अमोल पाटील आणि आनंदराव पाटील हे दोघे बाप लेक आपल्या हातात कुऱ्हाड आणि कोयता घेऊन दशहत दाखवित अंगावर याल तर यानेच मुडदा पाडू असे सांगत होते. त्यामुळे कुणी ही पुढे जायला तयार होईनात. कुणी तरी या घटनेची माहिती कुरळप पोलीसांना दिली होती पोलीस येईपर्यत घटनास्थळावरून ते दोघे बाप लेक हालले नव्हते. त्याच्या डोळ्यात सुडाची आग दिसत होती. पोलीसांनी घटनास्थळावरील गर्दी हटवत आनंदराव पाटील आणि अमोल पाटील याना त्याचेकडील शस्त्रासह ताब्यात घेतले. गंभीर जखमी असलेल्या रमेश पाटील याला ऊपचारासाठी कुरळप येथील सरकारी दवाखान्यात पाठविले परंतू तेथे दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनाम करून मृतदेहाचे शवविच्छेदन सरकारी रुग्णालयात केले. या घटनेची लेखी फिर्याद मयत रणजित रमेश पाटील याचा चलुत भाऊ प्रविण शंकर पाटील याने कुरळप पोलीसात दिली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी रणजीत रमेश पाटील (वय ३१) याच्या खून प्रकरणी आनंदराव सावळा पाटील (वय ७७) त्याचा मुलगा अमोल आनंदराव पाटील (वय २७) याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना अटक केले. त्याचेकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून रणजित पाटील याचे आपल्या सुनेशी अनैतिक संबध असल्याच्या संशयातून खून केल्याचे सांगितले. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता आणि कुऱ्हाड जप्त केला. या घटनेचा पुढील तपास कुरळप पोलीस ठाण्याचे स.पो.नी. दीपक जाधव याचे मार्गदर्शनाखाली हेड कॉ.बाजीराव भोसले हे करीत आहेत. केवळ संशयाने आपल्या घरातील महिलेचे नात्यातील रणजीत पाटील याच्याशी अनैतिक संबंध आहेत याची खात्री पटल्याने आनंदराव पाटील आणि त्याचा मुलगा अमोल पाटील यांनी रणजित पाटील याचा भर दिवसा गावातील वारणा बाझारच्या चौकात निर्घृणपणे खून केला.

राजाच्या अन्काऊंटरचा डाव भारी ...

इंग्रजांच्या राज्यात या राजा-महाराजांचे रुपांतर संस्थानिकांत झाले तर पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर आलेल्या काँग्रेस राजवटीत या संस्थानिकांचे रुपांतर हे सामान्य जनतेत झाले. त्यांच्या अनेक अधिकारांवर गदा आणली गेली. इंदिरा गांधी पंतप्रधान पदी असताना त्यांनी तर या संस्थानिकांचे पेन्शनही रद्द करून टाकले होते. त्यामुळेच काही संस्थानिक आणि काँग्रेसचे सूर कधीच जुळले नाहीत. राजस्थानातील भरतपूर हे असेच एक मानी संस्थान होते. येथील संस्थानिक राजा मानसिंह हे कायम दोन झेंडे फडकवित असत. एक देशाचा तिरंगा आणि दुसरा आपल्या भूतपूर्व राजवटीचा, भरतपूर संस्थानाचा! काँग्रेस कार्यकर्त्यांचा याला आक्षेप होता. पण संस्थानिक मानसिंह हे भरतपूर येथील जनतेत लोकप्रिय होते. जनतेला त्यांनी लावलेले दोन झेंडे कधीच खुपले नाहीत. त्यामुळेच की काय, १९५२ ते १९८४ पर्यंत पार पडलेल्या राजस्थान विधानसभेच्या प्रत्येक निवडणुकीत जनतेने काँग्रेसचा उमेदवार पाडत राजा मानसिंह यांना प्रचंड बहुमताने निवडून दिले होते. पण, १९८५च्या निवडणुकीत यंदा काहीतरी निराळेच घडत होते. काँग्रेसने यावेळी प्रचारात जोरदार आघाडी घेतली होती. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या झालेल्या दुर्दैवी हत्येनंतर जनतेच्या मनात काँग्रेसप्रती सहानुभूती निर्माण झाली होती. त्यामुळेच आजवर हाती न आलेली भरतपूर-डिग विधानसभेची जागा जनता आपल्याच पदरात टाकेल, ही आशा मुख्यमंत्री शिवचरण माथूर यांच्या मनात निर्माण झाली होती. त्यांनी राजा मानसिंह यांच्या विरोधात एक निवृत्त सनदी अधिकारी विजेंद्र सिंह यांना काँग्रेसच्या तिकिटावर उभे केले होते आणि आता मुख्यमंत्री माथूर हे जातीने भरतपूर-डिग विधानसभा मतदारसंघात प्रचाराला उतरले होते. खुद्द मुख्यमंत्री प्रचारासाठी येत आहेत म्हटल्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता आणि काहीही झाले तरी यावेळी ही सीट जिंकून आणायचीच, या ईर्ष्येने कार्यकर्ते कामाला लागले होते. दि. २० फेब्रुवारी १९८५ ला मुख्यमंत्री महोदयांच्या एक भव्य रलीचे डिग येथे आयोजन करण्यात आले होते. मात्र, उत्साहाच्या भरात काँग्रेस कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवार राजा मानसिंह यांची पोस्टर्स फाडून टाकली आणि त्यांचा संस्थानाचा झेंडा देखील उखडून टाकत त्याजागी आपल्या पक्षाचे झेंडे फडकवले. याची खबर लागताच राजा मानसिंह भडकले आणि मुख्यमंत्र्यांना जाब विचारण्यासाठी ते तडक आपल्या जीपमधून निघाले. मुख्यमंत्री माथुर हे हेलिकाप्टरने डिग येथे एका हेलिपडवर उतरले आणि सभेला संबोधित करण्यासाठी निघून गेले. राजा मानसिंह हे जेव्हा हेलिपडजवळ आले, तेव्हा रिकामे हेलिकाप्टर पाहून त्यांचा पारा चढला. मुख्यमंत्री हे आपल्याला टाळून निघून गेल्याचा त्यांचा समज झाला आणि मुख्यमंत्र्यांना धडा शिकवण्यासाठी त्यांनी आपल्या जीपने हेलिपडवर उभ्या असलेल्या हेलिकाप्टरला जोरदार धडक दिली आणि हेलिकाप्टरचे नुकसान केले. झाला प्रकार हेलिकाप्टरच्या पायलटकडून मुख्यमंत्री माथूर यांना समजताच त्यांनी राजा मानसिंह यांच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. साक्षात् मुख्यमंत्र्यांच्या हेलिकाप्टरला धडक देणे हा एकप्रकारे घातपाताचाच प्रकार मानला गेला. पण हेलिकाप्टरला धडक देऊन राजा मानसिंह यांचा राग शांत झाला नाही. त्यांनी आपला मोर्चा मुख्यमंत्र्यांच्या सभास्थानाकडे वळवला आणि मुख्यमंत्री तिथे पोहोचण्याच्या आत सभास्थानी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह पोहोचून राजा मानसिंह यांनी सभास्थानाचा विध्वंस केला. मुख्यमंत्री माथूर यांनी याही प्रकरणी पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल केला. दुसऱ्या दिवशी, दि. २१ फेब्रुवारी १९८५ रोजी या घटनांना वृत्तपत्रांत मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यात चीड निर्माण झाली. राजा मानसिंह यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्याच हेलिकाप्टरवर हल्ला चढविल्याच्या बातमीने भरतपूर-डिग भागातील वातावरण तंग झाले. काँग्रेस कार्यकर्ते आणि राजा मानसिंह यांचे कार्यकर्ते भिडण्याची चिन्हे दिसू लागली. अशा स्थितीत डिग जिल्हा पोलीस उपअधीक्षक कानसिंह भाटी यांना राजा मानसिंह यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आले. भाटी हे कात्रीत सापडले. त्यांना राजा मानसिंह यांची लोकप्रियता माहित होती. निवडणुकीच्या ऐन मोसमात मानसिंह यांना अटक करणे म्हणजे जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण करण्यासारखे होते. पण वरून दबाव आल्यामुळे भाटी हे आपल्या सोबत १८ पोलीस कर्मचाऱ्यांचा फौजफाटा घेऊन मानसिंह यांना बेड्या ठोकण्यासाठी निघाले. इकडे मानसिंह यांनाही पोलीस फोर्स आपल्याला अटक करण्यासाठी येत असल्याची खबर लागली. आपल्याला अटक झाली तर नाचक्की होईल, ही बाब ते जाणून होते. त्यामुळे पोलिसांनी अटक करण्यापेक्षा आपणच सरेंडर व्हावे असा विचार करून तेही प्रचारस्थानावरून पोलीस ठाण्याच्या दिशेने जीपने निघाले. यावेळी त्यांच्या सोबत त्यांचे दोन नातेवाईक ठाकूर सुमेरसिंह आणि हरी सिंह हेदेखील होते. मानसिंह यांची जीप डिग येथील बाजारपेठेत आली असता अचानक पोलिसांची जीप त्यांना आडवी आली. यावेळी पोलीस आणि तापट स्वभावाच्या मानसिंह यांच्यात बाचाबाची झाली. मानसिंह हे स्वतःला अटक करू देईनात आणि आपण स्वतःच सरेंडर करत आहोत, असे पोलिसांना सांगू लागले. पण पोलीस मानसिंह यांना अटक करून नेण्यावर ठाम होते. शब्दाने शब्द वाढत गेला आणि गोळीबार झाला. मानसिंह यांच्या जीपसोबत त्यांचे शेकडो कार्यकर्ते होते. त्यांच्या घोळक्यात असलेल्या मानसिंह आणि त्यांच्या दोन नातेवाईकांना गोळ्या लागल्या व ते तिघेही जागीच गतप्राण झाले. हा गोळीबार पोलिसांनी केला की आणखी कोणी केला हे समजण्यात बराच वेळ गेला. तोवर अफरातफरी माजली. आपल्या लाडक्या राजाला पोलिसांनी गोळ्या झाडून मारले असा समज झाल्याने जनता प्रक्षुब्ध झाली आणि भरतपूर-डिग भागात घटनेचे तीव्र पडसाद उमटले. ठिकठिकाणी जाळपोळ, लुटालूट व हाणामारीच्या असंख्य घटना घडल्या. मानसिंह यांचे कार्यकर्ते आणि काँग्रेस कार्यकर्ते एकमेकांना भिडले. जिल्हाधिकारी यांना प

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:13 PM Page 1

माझं लातूर परिवाराच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू निदान आणि शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद!

लातूर/करकरे अंबादास

माझं लातूर परिवार आणि विलासराव देशमुख शासकीय विज्ञान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्र तपासणी शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिराचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. लक्ष्मण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे मार्गदर्शक डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, ज्येष्ठ विधिज्ञ ऍड बळवंत जाधव, ऍड. व्यंकट बेद्रे, सतीश तांदळे, डॉ. बालाजी सोळुंके, नेत्र विभाग प्रमुख डॉक्टर उदय मोहिते, वैद्यकीय अधिक्षक डॉ. संतोष डोपे, डॉ. श्रीधर पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या माझं लातूर परिवारने गत दोन वर्षापासून लातूर शहरात विविध जन हिताचे उपक्रम हाती घेतले आहेत, याचाच एक भाग म्हणून लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माझं लातूर परिवाराच्या सदस्यांकडून तपासणी पूर्व नोंदणी करण्यात आली होती. दिनांक ५ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९ ते दुपारी २:३० वाजेपर्यंत चाललेल्या या शिबीराचा लाभ जिल्ह्यातील २४७ नेत्र रुग्णांनी घेतला तर विक्रमी १५३ नेत्र रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र असल्याचे निष्पन्न झाले. या सर्व रुग्णांवर शासकीय महाविद्यालयाच्या सुसज्ज अशा नेत्र विभागात दररोज १० ते १५ या प्रमाणात शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती डॉ उदय मोहिते यांनी दिली आहे. आजपर्यंत २३ रुग्णांची शस्त्रक्रिया पार पडली आहे. विलासराव देशमुख शासकीय विज्ञान संस्थेचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी शिबीरात आलेल्या सर्व रुग्णांना मोफत, दर्जेदार आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध केली जाणार असल्याची ग्वाही दिली तर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. लक्ष्मण देशमुख यांनी नेत्र शिबीरात उपचार घेणाऱ्या रुग्णांना औषधांचा पुरवठा केला जाणार असल्याची माहिती यावेळी बोलताना दिली. महाविद्यालयाचे नेत्र विभाग प्रमुख डॉ. उदय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नंदकुमार डोळे व इतर तज्ञ डॉक्टर सर्व शस्त्रक्रिया करणार आहेत. या कामी डॉ प्रतीक, डॉ श्रेयश, डॉ अश्विनी, डॉ हर्षदा यांचे सहकार्य लाभत आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी माझं लातूर परिवाराचे अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, ऍड प्रदीप मोरे, प्रमोद गुडे, काशिनाथअप्पा बळवंते, दिपरत्न निलंगेकर, संजय स्वामी, गोपाळ झंवर, विनोद कांबळे, नारायण पावले, प्रा भालचंद्र येडवे, वामन पाठक, मासुम खान, अमर करकरे, रत्नाकर निलंगेकर, सचिन अंकुलगे, अरविंद रेड्डी, युवराज कांबळे, प्रशांत दुधमांडे, दीपक मिरकले, किशोर जैन, उमेश कांबळे, इम्रान नाईकवाडे, आनंद माने, आशा अयाचित, दत्तात्रय परळकर, ,विष्णू अष्टेकर, भास्कर कुंभार, अजय वाघमारे, सुनिल गवळी, राजेश तांदळे, सचिन साळुंके, निलेश श्रॉफ, राजकुमार सोनी, प्रशांत साळुंके यांच्यासह माझं लातूर परिवाराच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण हेच खरे अभिवादन – भिक्खू पय्यानंद

लातूर/प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समस्त भारतीयांचे उध्दारकर्ते असून त्यांनी देशाला संविधानाची अमूल्य अशी भेट दिली आहे. प्रत्येकाला मतदानाचा अधिकार व सर्व प्रकारची हक्क त्यांच्यामुळेच प्रत्येक नागरिकांना मिळाले आहेत त्यामुळे त्यांनी दिलेल्या विचारांची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे म्हनूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे समाजामध्ये कृतिशील आचरण करणे हेच खरे त्यांना अभिवादन आहे असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद यांनी केले आहे. प्रकाश नगर येथील नालंदा बुध्द विहारात आणि महाविहार सातकर्णी नगर येथे ०६ डिसेंबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करणात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना भिक्खू पय्यानंद बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत बुध्द आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पुजा करुन सामुहिक अभिवादन करून बुध्दवंदना घेण्यात आली. यावेळी प्रा.यु.डी. गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला विहार समितीचे उत्तम कांबळे, ज्ञानेश्वर सुरवसे, अड.टि.एस. कांबळे, पंडीत सुर्यवंशी, अनिरुध्द बनसोडे, बाबुराव बनसोडे, सुरेश सोनकांबळे तर प्रज्ञा महिला मंडळाच्या शशिकला सुरवसे, शंकुतला सोनवणे, आशा उडाणसिंह, राजश्री लांडगे, कमल गाडे, करुणा सुर्यवंशी, परमेश्वर आदमाणे, अविनाश आदमाणे, गौतम आदमाणे, गोविंद वरुडकर आणि सोमेश सोनवणे आदीजन उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिरुध्द बनसोडे यांनी केले तर आभार अण्णासाहेब सोनवने यांनी मानले.

भद्रावती येथील लाचखोर तहसिलदार लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात!

चंद्रपूर/प्रतिनिधी



दोन महिन्यांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे तहसीलदार म्हणून रुजू झाले. डॉ. निलेश खटके यांना नागपूर लाचलुचपत विभागाने २५ हजार रुपये घेताना रंगेहात अटक केली आहे. विटभट्टीसाठी लागणाऱ्या लाल माती उत्खननाची परवानगी देण्यासाठी तहसीलदार खटके यांनी फिर्यादीला तब्बल २५ हजार रुपये मागितले. मात्र लाच द्यायची इच्छा नसल्याने याबाबत फिर्यादीने लाचलुचपत विभागाला संपर्क साधत तक्रार केली. तक्रारीची पडताळणी केल्यावर तहसील कार्यालय भद्रावती येथे २५ हजार रुपये स्वीकारताना तहसीलदार खटके यांना रंगेहात अटक करण्यात आली. दोन महिन्यांपूर्वी पोंभुर्णा तालुक्यात तहसीलदार म्हणून कार्यरत खटके यांची बदली भद्रावती येथे झाली होती. मात्र महिन्याभराच्या कालावधीत त्यांना लाच प्रकरणी अटक झाल्याने महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे. पुढील कारवाई नागपूर लाचलुचपत विभागाचे अधिकारी करीत आहेत.

नवली गाव ते बिडको रोड येथील वाहतुक पर्यायी मार्गाने

पालघर : नवली गाव- नवली फाटक- बिडको रोड, येथिल प्रस्तावित उड्डाणपुलाच्या बांधकामाकरिता अवजड वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. अशी अधिसुचना अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण महाजन यांनी जारी केली आहे. सदर वाहतुक नियंत्रण अधिसुचना ०६ जानेवारी २०२२ पर्यंत अंमलात राहणार आहे. मुंबईकडून पालघरकडे येणारी वाहने ही सेंट जॉन कॉलेज चाररस्ता- वळणनाका आय.सी.आय.सी.आय. बँक- आर्यन स्कूल- मोरे भंडारी हॉल- पालघर शहर बिडको या मार्गे ये-जा करतील, पालघर बिडको कडून मुंबईकडे जाणारी वाहने बिडको- मोरे भंडारी हॉल- आर्यन स्कूल आय.सी.आय.सी.आय. बँक वळणनाका- चाररस्ता- सेंट जॉन कॉलेज मुंबईकडे या मार्गे ये-जा करतील. उपरोक्त मार्गावर बुधवार दि.०८/१२/२०२१ रोजी पासून ते गुरूवार दि.०६/०१/२०२२ पर्यंत सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांस प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदरची वाहतुक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, महसूल विभागाची वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलिसांनी परवानगी दिलेली वाहने, उपविभागीय दंडाधिकारी व तालुका दंडाधिकारी यांनी परवानगी दिलेली वाहने तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांनी परवानगी दिलेल्या वाहनांना लागू राहणार नाही.

आठवडाभरात वाडा आगाराच्या सहा बसच्या ग्रामीण भागात रोज २४ फेऱ्या सुरु

वाडा/प्रतिनिधी

एक महिन्याच्या संपानंतर (दि.३डिसेंबर) वाडा आगाराचे दोन चालक व दोन वाहक कामावर हजर झाल्याने दोन बस प्रवाशांच्या सेवेसाठी धावल्या तर शुक्रवार (दि.१० डिसेंबर) पर्यंत आणखी चार वाहक व चार चालक कामावर हजार झाल्याने एकूण सहा बस ग्रामीण भागाच्या फेऱ्या मारत असून एका दिवसात २४ फेऱ्या होत असल्याचे येथील वाहतूक नियंत्रक महेश पष्टे यांनी सांगितले. बुधवार दिनांक १ डिसेंबर पासून सर्व शाळा व महाविद्यालये चालू झाले असून बस बंद असल्याने विध्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे. हे टाळण्यासाठी बस चालू करण्याची पालकांकडून मागणी होत आहे. तर वाड्यातील शाळा व महाविद्यालयात शिकणारे विध्यर्थी हे बहुतेक ग्रामीण भागातून येत असल्याने या सहा बस चालू झाल्यानेलं काही प्रमाणात त्यांचीही गैरसोय टळल्याने विद्यार्थ्यामध्ये समाधान व आनंद दिसून येत आहे. वाडा आगाराचे व्यवस्थापक मधुकर धांगडा यांनी संपावर असलेल्या कर्मचाऱ्यांना वारंवार कामावर येण्याचे आवाहन केल्याने दोन-दोन कर्मचारी कामावर हजर होत असून येत्या काही दिवसात जास्तीतजास्त कर्मचारी कामावर हजर होतील अशी अपेक्षा आगार व्यवस्थापक धांगडा यांनी व्यक्त केली आहे. तालुक्यातील सापना(बु.) हे गाव महामार्गापासून तीन किलोमीटरच्या अंतरावर असून रस्त्यावरील काही भाग निर्मनुष्य असल्याने मुलं-मुली चालत येण्यास घाबरतात, गावातून जवळपास चाळीस विद्यार्थी रोज वाड्यातील शाळेत येत असल्याने त्यांना रोज गाडीभाड्यासाठी रोख रक्कम द्यावी लागत आहेत, आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कधी कधी ते शक्य होत नाही, तरी प्रशासनाने या विध्यार्थ्यांचा सहानुभूतीने विचार करून आमच्या गावासाठी सकाळची एकतरी बस सुरू करावी.अशी मागणी सापणे येथील १०-१२ महिला एकत्र येऊन व्यवस्थापकांकडे केली आहे.

महाराष्ट्र शासन

डहाणू वनविभाग डहाणू

जाहिर सूचना

तमाम लोकांस याद्वारे सूचना देण्यांत येते की. डहाणू वनविभागातील मांडवी वनपरिक्षेत्रातील मे. लोपीस सॉमिल, कातरवाडी, आगाशी ता. वसई जि. पालघर येथील सर्वे क्रमांक २८२/७ या जागेतील आरागिरणी जुना परवाना क्र. ०४३/१९६६ व नवीन परवाना क्रमांक १३१ आयडी क्रमांक MH1754 THTH असून आरागिरणीधारक श्री. फेड्रीक संज्याव लोपीस रा. कातरवाडी आगाशी ता. वसई जि. पालघर यांनी दि. १४/१२/२०२० रोजी श्री. विन्सेंट थॉमस कोरिया रा.नाळा, स्मशान भूमीरोड, ता. वसई जि.पालघर यांना विक्री केल्याने सदर आरागिरणी परवाना त्यांचे नांवे हस्तांतरण, नामांतरण, स्थानांतरण होण्याकरिता प्रस्तावित आहे.

उक्त मालमत्तेवर वारसा, गहाणखत, विक्री, लिज, कायदेशीर हक्क, भेट अथवा कोणतेही स्वरूपाचा हितसंबंध किंवा या परवाना हस्तांतरण, नामांतरण, स्थानांतरण संबंधात कोणताही आक्षेप असणाऱ्या व्यक्तीने /दावा करणाऱ्या वा हरकत असणाऱ्या व्यक्तीने ही सुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत तत्संबंधीची उक्त माहिती निम्न स्वाक्षरीकार यांचे खालील कार्यालयाचे पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे. दिलेल्या मुदतीत उक्त, संबंधात कोणताही दावा वा हरकत न आल्यास दावा हरकत नसल्याचे समजण्यात येईल आणि मुदतीनंतर प्रकरणी येणारा कोणताही दावा वा हरकत विचारात घेतली जाणार नाही.

ठिकाण : डहाणू
दिनांक : ०३/१२/२०२१

सही/-
(वि. ज. भिसे)
उप वनसंरक्षक,
डहाणू वनविभाग, डहाणू

कार्यालय पत्ता
उपवनसंरक्षक, डहाणू वनविभाग, डहाणू
आगररोड, पंचायत समितीजवळ,
डहाणू ता. डहाणू जि. पालघर पिन नं. ४०१ ६०१
ईमेल : dycfdahanu@mahaforest.gov.in
dahanudcf@gmail.com

जिमाका/पालघर/जाहि ५७/४७८/२०२१ दिनांक : ०८/१२/२०२१

सात दिवस रात्र दिवस तपास करून रिक्षा शोधली; विसरलेली बॅग प्रामाणिकपणे प्रवाशाला परत दिली

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर शहरात एक नव्हे दोन नव्हे तर सात दिवस रोज दिवसा रात्री आणि पहाटे लॅपटॉप विसरलेली तक्रार देऊन पोलीस रिक्षाच्या शोधात पोलिसांची सर्वच रिक्षा स्टॉप वरील चालकाची विचारणा एवढेच नव्हे गुन्हा दाखल करण्याची तंबीही पोलिसांनी शोध मोहिमेत रिक्षाचालकांना दिली. सात दिवसांच्या प्रयत्नानंतर त्या रिक्षा बद्दलची गोपनीय माहिती पोलिसांना दिली. पोलीस येणार याबाबतची माहिती मिळताच त्या रिक्षाचालकाने संबंधित व्यापाऱ्याला सर्व साहित्यासह ती बॅग परत करून पोलिसांना खबर दिली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी आहे की प्रतीक दीपक कोकरे (वय २८ रा. इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर) हा २९ नोव्हेंबर २०२१ रोजी पहाटे पुण्याहून सोलापुरात आला. सोलापुरात पुणे नाका येथे खाजगी बस मधून उतरून रिक्षाने घरी पोहोचला घरी पोहोचल्यानंतर लॅपटॉप व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग रिक्षात विसरल्याचे लक्षात आले खूप प्रयत्न करूनही रिक्षाचालक आढळून आला नाही. त्यामुळे संबंधित प्रतिक कोकरे याने नवी वेस पोलीस चौकीत तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलीस नाईक विठ्ठल पैकेकरी व पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर माने यांनी दहा दिवस रोज दिवसा रात्री आणि पहाटे त्या रिक्षाचालकाचा शोध घेऊन संबंधित व्यापाऱ्यास ती बॅग परत केली गेल्या काही दिवसापासून सोलापूर शहर पोलीस दलातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणा समोर आला आहे या कामांचे ही पोलीस आयुक्तांनी दखल घेऊन अनेकांना बक्षीसही दिले असल्याचे सांगण्यात आले.

थोडक्यात वृत्तांत

संताजी जगनाडे महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन!

मुंबई : संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आज मंत्रालयात संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून वंदन केले.

स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर पुरवठा

पालघर : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने, कल्टिव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर खरेदी करणेसाठी DBT (Direct Benefit Transfer) तत्वावर ९०% अनुदान (कमाल रक्कम रु.३.१५ लाख च्या मर्यादेत) देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविली जात आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेकरीता पालघर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बचत गटांनी आपले प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर यांचे कार्यालयात सादर करावेत. या संबंधी अधिक माहितीकरीता आफरीन अपार्टमेंट, बी-विंग, पहिला मजला, रुम नं. १०७ येथिल कार्यालयाशी तसेच दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५४२७७ वर संपर्क साधून जास्तीत जास्त बचत गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर यांचेकडून करण्यात येत आहे.

नवीन जोडप्यास २० हजारांचे अर्थसहाय्य!

पालघर : महाराष्ट्रात अनुसूचित जाती (नवबौध्दासह), विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटूंबातील सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांना रु.२० हजार इतके अर्थसहाय्य तसेच सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे विवाहासाठी रु. ४ हजार देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविली जात आहे. या योजनेसंबंधी अधिक माहितीकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर आफरीन अपार्टमेंट, बी-वींग, पहिला मजला, रुम नं. १०६, १०७ रेल्वे फाटकाजवळ नवली, पालघर (पु.) येथिल कार्यालयाशी किंवा दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५४२७७ वर संपर्क साधावा.

जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या सदस्यपदी डॉ. महाशब्दे

मुंबई : डॉ. साधना सुनील महाशब्दे यांना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या सदस्यपदाची शपथ देण्यात आली. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातील परिषद सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य संजय कुलकर्णी, श्वेताली ठाकरे, जलसंपदा विभागाचे विशेष कार्य अधिकारी विजयकुमार गौतम, सचिव बसवंत स्वामी, मुख्य अभियंता अतुल कपोले, प्राधिकरणाचे सचिव रामनाथ सोनवणे, उपसचिव जया पोतदार आदी उपस्थित होते. डॉ. साधना महाशब्दे यांची विधी क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. महाशब्दे यांनी मुंबई विद्यापीठातून कायद्यातील मास्टर्स पदवी मिळवली आहे. त्या मागील वीस वर्षे मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करतात. त्यांचा पर्यावरण विषयक कायदा क्षेत्रात विशेष अभ्यास आहे.

नारळ पिक विमा योजनेचा लाभ घ्यावा

पालघर : सततचे बदलते वातावरण, अवेळी पडणारा पाऊस यामुळे शेतकरी राजस अनंत अडचणींना तोंड देऊन आर्थिक नुकसान सोसावे लागते यासाठी शेतकर्यांनी शासनाच्या नारळ पिक विमा योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आहावन जिल्ह्य अधीक्षक कृषी अधिकारी, के बी तरकसे यांनी केले आहे. नारळ पिक विमा योजना : नारळ हे बहुवार्षिक पिक असून जैविक व अजैविक घटकांना बळी पडते त्यामुळे नारळ पिक विमा योजनेद्वारे अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीस नारळ विमा योजनेद्वारे संरक्षण देण्यात येते. नारळाच्या पिकास वातावरणातील बदल, नैसर्गिक आपत्ती, कीड/रोग व तत्सम बाबींपासून धोका असतो. किंबहुना एखाद्या क्षेत्रातील झालेल्या किडींच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण नारळ पिकास नुकसान होते. नारळ हे बहुवार्षिक पिक असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीस सामोरे जावे लागते अशा परीस्थित्त होणाऱ्या नुकसानीस संरक्षण मिळणे गरजेचे आहे. विमा व्याप्ती : नारळ विमा योजनेतंर्गत निरोगी, फळे येणाऱ्या सलग किंवा मिश्र लागवड केलेल्या बांधावरील किंवा परसबागेतील सर्व जातीच्या बुटक्या तसेच उंच नारळाच्या झाडांचा विमा करता येईल. विमा हप्ता : विमा हप्त्यातील रक्कम नारळ विकास मंडळाद्वारे (५० टक्के), महाराष्ट्र शासनाद्वारे (२५ टक्के) विमा हप्ता अनुदान म्हणून दिला जाईल. तर २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांनी विमा हप्ता म्हणून भरावयाचा आहे.

स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना इरादापत्रासाठी मुदतवाढ

मुंबई : कोविडमुळे स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना इरादापत्रासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. इरादापत्रातील अटी व शर्तींची पुर्तता करू न शकल्यामुळे मार्च २०२० पासून पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये ज्यांचे इरादापत्र कार्यान्वित होते त्यांना ९ महिन्यांचा भरपाई कालावधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:13 PM Page 1

सरकारला शेतकऱ्यांनी झुकवले!

तीन कृषी कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी गेल्या ३७८ दिवसांपासून शेतकऱ्यांचे जे आंदोलन सुरू होते ते अखेर एकदाचे संपले. या आंदोलनात मोदींचा अहंपणा आणि पाशवी बहुमताच्या जोरावर केंद्र सरकारची जी मुजोरी सुरू होती त्याला कुठेतरी चपराक बसली आहे. आणि यातून मोदी आणि त्यांच्या पक्षाचे लोक धडा घेतील असे समजायला हरकत नाही. शेवटी लोकशाहीत लोकच केंद्र बिंदू असतात. त्यामुळे लोकांच्या मर्जी विरुद्ध कुठल्याही पक्षाच्या सरकारने काही केले तरी त्यांची आता जशी मोदी सरकारची फजिती झालीय तशी फजिती होऊ शकते. पण या ऐतिहासिक आंदोलनाने देशातील गरीब जनतेला सरकारविरुद्ध लढण्याची जिद्द आणि बळ दिले आहे. त्याच बरोबर इलेक्ट्रॉनिक मीडियाला त्यांची औकात दाखवून दिलीय. कारण हे आंदोलन जेंव्हा सुरू होते तेंव्हा या आंदोलनातील शेतकऱ्यांना आतंकवादी खलिस्तान वादी ठरवण्याचे काम याच इलेक्ट्रॉनिक मिडियावाल्यांनी केले होते आणि वर्षभराने का होईना मोदींनी माफी मागून शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करताच इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या सर्व सुंदर महिला अँकरांचा चेहरा पडला होता, जणू काही त्यांच्या घरातला कुणीतरी करता पुरुष मेल्याचे दुःख त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात. त्यामुळे अन्नदात्या बळीराजाची बाजू घेण्याचे सोडून इलेक्ट्रॉनिक मीडिया वाल्यांनी आपली पत्रकारिता केंद्राच्या पायावर ठेवली होती. जगात इतका कृतघ्नपणा कुणीही केला नसेल. शेतकऱ्यांच्या या विजयात भाजप वाले आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया सोडून सर्व देश सहभागी आहे. भारता सारख्या कृषिप्रधान देशात अन्नदात्या बळीराजावर एक वर्षाहून अधिक काळ घरदार सोडून रस्त्यावर आंदोलन करण्याची पाळी यावी यासारखी शरमेची बाब नाही. वास्तविक ज्यांच्यामुळे हे सर्व रामायण घडले त्यांनी केवळ माफी मागून चालणार नाही, तर आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा. कारण या आंदोलनात ७००हून अधिक शेतकरी मारले गेलेत. त्यांचा इतकाच दोष होता की त्यांनी आपल्या न्याय मागण्यासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन केले आणि आंदोलन करणे हा लोकशाहीने दिलेला हक्क आहे. त्यामुळे कोणतेही आंदोलन सरकारला बळाच्या जोरावर मोडून काढता येणार नाही, हाच धडा या आंदोलनाने दिलाय. शेतकऱ्यांच्या वर्षभर चाललेल्या आंदोलनाने भारत सरकारला इथल्या शेतकऱ्या विषयी किती कळवळा आहे हेच जगणे पाहिले. जे मोदी सांगत होते की मला शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे आहे. त्यांनीच शेतकऱ्यांना वर्षभर रस्त्यावर बसवून ठेवले. मग शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होणार. या आंदोलनात शहीद झालेल्यांना सरकार नुकसान भरपाई देईल. त्यांच्यावरच्या केसेस मागे घेईल, पण वर्षभर आंदोलनाच्या निमित्ताने रस्त्यावर बसून राहिल्याने त्या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे ते कोण भरून देणार? सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना वर्षभर रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागले. त्यामुळे या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी अर्थातच सरकारची आहे. त्यामुळे भविष्यात अशी दीर्घकालीन आंदोलने होणार नाहीत याची सरकारने काळजी घ्यायला हवी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे लोकांच्या दैनंदिनी जीवनाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींवर निर्णय घेताना लोकांना विश्वासात घ्यावे. बहुमताचे सरकार आहे याचा अर्थ या सरकारला मनमानी करण्याचा परवाना दिला गेलाय असे नाही. जर जनता सरकारला सत्ता देऊ शकते, तर त्यांना सत्तेवरून खाली खेचू सुद्धा शकते. हेच प्रत्येक सरकारने लक्षात ठेवावे. या देशात शेतकऱ्यांच्या जवळपास ३००हून अधिक संघटना आहेत. आणि त्यात बहुतेक शेतकरी असल्याने शेती आणि शेतीशी संबंधित सर्व बाबी त्यांना ठाऊक आहेत. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे करताना शेतकरी संघटनांशी चर्चा करायला हवी होती. त्यांना नेमके काय हवे आहे ते समजून घ्यायला हवे होते. कारण मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील लोक काही शेती विषयक तज्ञ नाहीत. त्यामुळे केवळ कॅबिनेटमध्ये चर्चा करून शेतकऱ्यांना काय हवे आणि काय नको याचे आडाखे बांधणे योग्य नव्हते. पण प्रसिद्धीसाठी किंवा जनाधार वाढवण्यासाठी आजकाल राजकारणी काहीही करतात आणि नंतर तेच त्यांच्या अंगाशी येते. मोदी सरकारचे सुद्धा तेच झाले. शेतकरी संघटनांशी चर्चा न करता केलेले कृषी कायदे शेतकऱ्यांनी का मान्य करावेत? आणि याच मुद्यावर नाराज असलेल्या शेतकऱ्यांनी वर्षभर आनोडोलान केले. या आंदोलन काळात शेतकऱ्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार झाले. त्यांच्यावर लाठीचार्ज झाला ते दिल्लीत घुसू नये म्हणून तारांचे कुंपण उभारले गेले. तसेच संपूर्ण इलेक्ट्रॉनिक मीडियाला शेतकऱ्यांच्या विरोधात उभे करण्यात आले. त्यांनी या आंदोलना बाबत सतत अपप्रचार केला. पण एवढे करूनही सरकारला यश आले नाही. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदींना शेतकऱ्यांच्या समोर झुकावे लागले. ही आहे या देशातील जनतेची ताकत. जी राज्यकर्त्यांनी समजून घ्यावी आणि पुन्हा लोकांना विश्वासात न घेता कोणताही निर्णय घेऊ नये. कारण लोकांना जर ते निर्णय आवडले नाहीत तर लोकांमधे जनप्रक्षोभ उसळतो. अशावेळी सरकारने किती जरी बळाचा वापर केला तरी लोक एकत्र नाहीत. शेतकरी आंदोलनं हे सुरवातीला इतर आंदोलनाच्या सारखे साधे असेल असे सरकारला वाटले होते, पण जेंव्हा संपूर्ण देशातील शेतकऱ्यांनी भारत बंद करून आपली ताकद दाखवली तेंव्हा सरकारच्या पायाखालची वाळू सरकली आणि या देशातले सगळेच लोक काही मोदी भक्त नाहीत याचा त्यांना प्रत्यय आला. आणि त्यानंतर लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत या आंदोलनाचा भाजपला फटका बसला. तेंव्हा खऱ्या अर्थाने शेतकरी आंदोलनाचे सरकारला चटके जाणवू लागले. आणि आता काही निर्णय घेतला नाही तर आगामी पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीत आपले काही खरे नाही याची जाणीव होताच सरकारने शेतकऱ्यांच्या समोर शरणागती पत्करली आणि शेतकऱ्यांचा मोठा विजय झाला!

यातून ओबीसींनी धडा घ्यावा...!

संध्या स्ट्रोक
सोनू जाधव

महाराष्ट्रात ओबीसी समाजाची संख्या मोठी आहे. परंतु प्रत्येक राजकीय पक्ष त्याकडे केवळ एक व्होट बँक म्हणून बघतोय. ओबीसींचा विकास व्हावा, त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारावी असे मात्र कुठल्याही राजकीय पक्षाला मनापासून वाटत नाही. कारण जर ओबीसींची स्थिती सुधारली आणि सत्तेतील त्यांची टक्केवारी वाढली तर उच्च वर्णीय राज्यकर्त्यांचे काय होईल. कारण आजही ब्राह्मण असो की ९६ कुळी उच्च वर्णीय मराठा असो. या लोकांची आपल्यापेक्षा हलक्या जातीतल्या लोकांच्या हाताखाली काम करण्याची मानसिकता नाही. पण बाबासाहेबांच्या संविधानाने दलीत मागासवर्गीय ओबीसी आदी उपेक्षित समाजाला जो इतरांच्या बरोबरीने दर्जा दिला आहे. त्यामुळे आज वेगवेगळ्या क्षेत्रात या उपेक्षित समाजाने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे आणि हीच बाब उच्च वर्णीय लोकांना खटकते आहे. अर्थात सगळेच उच्चवर्णीय तसे नाहीत. जे वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ आहेत ज्यांना हिंदू धर्मातील जुनाट रूढी परंपरा मान्य नाहीत. जे चतूरवर्ण आणि जातीची उत्रंड मानीत नाहीत असे उच्च वर्णीय आजही गोरगरीब दलीत, आदिवासी आणि ओबीसींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. पण अशा विचारवंतांची संख्या खूप कमी असल्याने त्यांची कुठेतरी ताकत कमी पडतेय. त्यातच ओबीसी समाज वेगवेगळ्या जातीत विभागलेला आहे. आणि या सगळ्या जातीतले ओबीसी मराठ्या प्रमाणेच उच्च वर्णीय आहेत अशी त्यांची समजूत करून देण्यात आली आहे. त्यामुळे ओबीसींची एकजूट होत नाही. पण त्याचे दुष्परिणाम किती भयंकर असू शकतात ते आज ओबीसी समाजाला कळले असेल. ओबीसीचे राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर सगळेच राजकीय पक्ष छात्या बडवत आहेत, पण त्यांचा हा ओबीसींच्या प्रति असलेला आक्रोश किती फसवा आहे हे ओबीसी जोवर समजून घेत नाहीत तोवर ओबिसीचे काही खरे नाही. ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी भाजप आंदोलन करीत आहे. मग ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाने ज्या ज्या गोष्टींची मागणी केली आहे त्याची केंद्रातील भाजप सरकारकडून पूर्तता का केली जात नाही? ओबीसी आरक्षणासाठी महत्वाचा असलेला इंपेरिकल डेटा केंद्र सरकार का देत नाही? याचा जाब भाजपतील मुंडे भगिनी सारख्या महिला नेत्यांनी केंद्राला विचारावा. इथे जे भाजपवाले आंदोलन करीत आहेत त्यात त्यात फडणवीस चंदू दादा महाजन यांच्यासारखे उच्च वर्णीय सोडले तर बहुतेक ओबीसीच आहेत. त्यांनी इथे आंदोलन करण्यापेक्षा दिल्लीत भाजप कार्यालयासमोर आंदोलन करून इंपरिकल डेटा मागावा. इथे पेक्षा आज ओबीसीचे राजकीय अस्तित्व महत्वाचे आहे ते जर टिकले तर कुठल्याही पक्षात जाऊन आपली शक्ती निर्माण करता येईल. अन्यथा भाजपतील उच्च वर्णीय नेत्यांच्या मागे आयुष्भर झेंडे घेऊन झिंदाबाद मुर्दाबाद करीत फिरावे लागेल. राहता राहिला सवाल महा विकास आघाडी सरकारचा, तर तिथेही त्याच लोकांचे वर्चस्व आहे. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री हे सगळे कोण आहेत तेच लोक आहेत ना! त्यांना काय पडलीय ओबीसींची? त्यांना खरोखरच जर ओबीसींच्या राजकीय आरक्षणाची फिकीर असती तर मराठा आरक्षणासाठी त्यांनी ज्या पद्धतीने गल्ली पासून दिल्ली पर्यंत प्रयत्नांची शिकस्त केली तशी ओबीसी साठी केली नसती का? या सर्वांचे मुखवटे आणि चेहरे वेगवेगळे आहेत आणि त्यांच्या बाबतीत एकच वास्तव आहे आणि ते म्हणजे ते उच्चवर्णीय असल्याने त्यांना सत्तेच्या राजकारणात दलीत ओबीसीचे वर्चस्व नको. स्वतःला अजूनही मराठा समजून स्वतःचीच स्वतः फसवणूक करून घेणाऱ्या ओबीसीचे आज राजकीय आरक्षण रद्द झालेय. उद्या शैक्षणिक आणि नोकऱ्यांमध्ये असलेले २७ टक्के आरक्षण सुद्धा रद्द होऊ शकते. हे लक्षात असूद्या! म्हणूनच राज माझा, उधव माझा, फडणवीस माझा, चंदू दादा माझा, अजित दादा माझा, संभाजी राजे माझे, उदयन राजे माझे असे म्हणून आणि स्वतःला मराठा म्हणून घेत या नेत्यांच्या मागे धावणाऱ्या ओबीसी बांधवांनी उद्या तुमचा मुलगा कितीही उच्च शिक्षित असला तरी त्याला ब्राह्मण किंवा मराठा समाजातील मुलगी लग्नासाठी मिळणार नाही आणि जर प्रेमविवाह झाले तरी त्याला मंजुरी मिळणार नाही. कदाचित ऑनर किलिंगचा प्रकार घडू शकेल. तेंव्हा आपण ओबीसी असलो तरी उच्च वर्णीय आहोत. दलितांपेक्षा वेगळे आहोत. या फसव्या मानसिकतेमधून बाहेर पडा. हिंदू धर्मातील जातीच्या उतरंडीने हिंदू धर्माचे किती आणि कसे नुकसान केले आहे याचा इतिहास तपासून बघा आणि स्वतःची लढाई स्वतः लढा. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप हे राजकीय पक्ष तुम्हाला राजकीय आरक्षण मिळवून देतील यावर विश्वास ठेऊ नका. ओबीसी आहात तर ओबीसी म्हणूनच संघटित व्हा आणि ओबीसी म्हणूनच लढा जेंव्हा तुमची ताकत यांना दिसेल तेंव्हाच तुमचा न्याय हक्क मिळेल.

मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३

अमृत महोत्सवी वर्ष (विशेष लेख)

विविध कार्यक्रम आयोजित करुन एचआयव्ही नियंत्रणात

१ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जागतिक एड्स माह निमित्त जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्या मार्फत या सप्ताहात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. २०२१ ची थीम पुढील प्रमाणेआहे End inequalities End IDS, End pandemics संपवूया असमानता, संपवूया एड्स संपवूया महामारी ही आहे.

पालघर जिल्ह्यात ऑक्टोबर २०१४ पासून ते ऑक्टोबर २०२१ पर्यत एच. आय. व्ही तपासणीमध्ये वाढ झालेली दिसून येते व एच. आय. व्ही पॉझिटीव्ह होण्याचे प्रमाण मात्र कमी होताना दिसून आले. सुरक्षित रक्त पुरवठा, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, गुप्तरोग नियंत्रण कार्यक्रम, ॲटीरिट्रोव्हायरल थेरेपी, प्रहरी सर्वेक्षण, निरोध वाटप कार्यक्रम, प्रशिक्षण, कौटुंबिक आरोग्य जागृती मोहिम, शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, एच.आय.व्ही संसर्गित रुग्णांसाठी कम्युनिटी केअर सेंटर, एचआयव्ही संसर्गित रुग्णांसाठी ड्रॉप इन सेंटर, स्वयंसेवी संस्थामार्फत हस्तक्षेप प्रकल्प व एड्स प्रतिबंधात्मक विविध जनजागृती कार्यक्रम इ. विविध कार्यक्रमांचे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या वतीने नियमितपणे राबविले जात आहेत व त्यांचा सकारात्मक परिणाम पालघर जिल्ह्यात पहायला मिळतो. एच.आय.व्ही. नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विजय काळबांडे आतरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र केळकर, ग्रामीण रुग्णालय पालघर व मनोर चे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दिनकर गावीत निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर भोये, ग्रामीण रुग्णालय कासा चे वैद्यकीय अधिक्षक डॉ. धोंी, ग्रामीण रुग्णालय मनोरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोरे जिल्हा पर्यवेक्षक प्रफुल्लता पाटील तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आय सी टीसी समुपदेशक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ एनजीओ तसेच कर्मचारी यांनी एच. आय. व्ही. नियंत्रणात आणण्यासाठी आपले योगदान दिले.

जिल्हा एड्स नियंत्रण मध्ये अंतर्गत पालघर CDI Unit-ii या एनजीओ मार्फत सर्वोच्च न्यायालयाने criminal appealno. १३५/२०१० मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पीडितांना तसेच देह व्यापार करणाऱ्या १०५६ महिलांना व त्याच्या ५३० बालकांना आर्थिक सहाय्य मिळवून दिल्याबद्दल या संस्थेचे विशेष गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. इतरहि एनजीओने या संस्थेचे पेरणा घेऊन एच. आय. व्ही. संपविण्यासाठी शासनास सहकार्य कराणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे कोविड - १९ च्या प्रादुर्भाव लक्षात घेऊन ह्या वर्षी कुठेही प्रभात फेरी न घेता १) एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करून एच आय व्ही/ एड्स महामारी संपवूया २) मातेकडून होणाऱ्या बालकाला एच आयव्ही/एड्स संसर्गापासून प्रतिबंध (ईएमटीसीटी) ३) स्वतःचे एच आय व्ही स्टेटस जाणून घ्या (know your status) या सारख्या विषयांवर ऑनलाइन रांगोळी पोस्टर व स्लोगन विथ सेल्फी मास्क डिझाईन निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळालेल्या विद्याथ्यांना एच आय.व्ही एड्स कार्यक्रमामध्ये विशेष बहुमोल सहकार्य दिल्याबद्दल आयसीटीसी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच कोरोना काळात ठढ ची औषधे घरपोच दिल्याबद्दल एनजीओ, तसेच आयसीटीसी कर्मचाऱ्यांना विशेष गौरव प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच या विविध स्पर्धामध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयांना देखील प्रमाण पत्र देऊन त्यांच्या कार्याला पोत्साहन दिले. यामध्ये, उपजिल्हा रुग्णालय जव्हार आयसिटीसी चा प्रथम क्रमांक, ग्रामीण रुग्णालय विक्रमगड चा दूसरा क्रमांक, तर ग्रामीण रुग्णालय मनोरचा तृतीय क्रमांक आलेला असून एफआयसीटीसी मध्ये उपजिल्हा रुग्णालय कासा प्रथम, ग्रामीण रुग्णालय मोखाडा द्वितीय तर प्राथमिक आरोग्य केंद्र दांडी तृतीय क्रमांक PPP मध्ये श्री पूनीत लॅब प्रथम संजीवनी हॉस्पिटल विरार द्वितीय आणि डॉ. मोपकर लॅब नालासोपारा यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक डहाणू वडकून कॉलेजची विद्यार्थिनी मंदाकिनी रमेश गायकवाड, द्वितीय क्रमांक ज्युचंद्र वसईच्या सह्याद्रि शिक्षण सेवा मंडलच्या मीनल गमाणे तर तृतीय क्रमांक गोखले एज्युकेशन सोसायटी आर्ट कॉमर्स सायन्स कॉलेज च्या मोनिका चौधरी यांनी मिळवला. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक कला व वाणिज्य महाविद्यालय ओंदेच्या जागृती भगवान शेलार, द्वितीय क्रमांक इराणी महाविद्यालय वडकून तर तृतीय क्रमांक जवाहर नवोदय विद्यालय पालघरच्या शिल्पी कुमारी यांना मिळाला आहे. स्लोगन विथ सेल्फी स्पर्धेत प्रथम क्रमांक वड़ा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड सायन्स च्या विवेक गुरुनाथ भोईर, द्वितीय क्रमांक विवा कॉलेजचे प्रणय दिनेश मोहिते तर तृतीय डॉ. शांतीलाल धनाजी देवाशी महाविद्यालय वाडाच्या दीक्षिता अघाव यांना मिळाला आहे. मास्क मेकिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक सह्याद्रि शिक्षण सेवा मंडल ज्युचंद्रच्या अपेक्षा जाधव, द्वितीय क्रमांक जवाहर नवोदय विद्यालय पालघरचे तन्मय विशे तर तृतीय क्रमांक सह्याद्रि शिक्षण सेवा मंडल ज्युचंद्रच्या विभूति पाटील यांनी मिळविला आहे. तसेच एच आय व्ही एड्स कार्यक्रमामध्ये विशेष बहुमोल सहकार्य दिल्याबद्दल तसेच कोरोना काळात एआरटी ची औषधे वाटप तसेच काही रुग्णांना घरपोच नेऊन दिल्याबद्दल शेड एनजीओ, CDI Unit-li, सखी चार चौघी, कृपा फाउंडेशन, STHII एनजीओ, तसेच ग्रामीण रुग्णालय विरार आयसीटीसी समुपदेशक नेताजी निकम, तुलींज महानगरपालिका हॉस्पिटल नालासोपारा आयसीटीसी समुपदेशक मिता मोरे, ग्रामीण, रुग्णालय पालघर आयसीटीसी समुपदेशक चंदू गोवारी, उपजिल्हा रुग्णालय डहाणू समुपदेशक मीनाक्षी जाधव, उपजिल्हा रुग्णालय डहाणूचे RSH समुपदेशक जितेश भोये यांना विशेष गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. यामुळे या संस्था नव्या जोमाने कामात लागल्या आहेत. आतरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र केळकर यांनी सर्वांकडून शपथ वाचन करून घेतले. तसेच जिल्हा एड्स नियंत्रण संस्था पालघरच्या जिल्हा पर्यवेक्षिका प्रफुल्लता पाटील यांनी विविध कार्यक्रम घेण्यासाठी योगदान दिले.

मातेकडून होणाऱ्या बाळाला एच आय व्ही एड्स संसर्गापासून प्रतिबंध करणे (EMTCT) हे उद्दिष्ट समोर ठेऊन व जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेचे काम चालू असून मागील ६ वर्षात (ऑगस्ट १४) पासूनऑक्टोबर२०२१ पर्यत एकूण एच.आय.व्ही समुपदेशन व चाचणी संख्या ५२८२६ एवढी असून त्यापैकी एकुण एच. आय. व्ही बाधितांची संख्या १९०० एवढी आहे. हे प्रमाण २०१४-१५ मध्ये ०.७% होते ते आता ०.२ इतके झाले आहे. तसेच एकूण एच. आय व्ही समुपदेशन व चाचणी केलेल्या गरोदर मातांची संख्या ५७७६०९ एवढी असून त्यापैकी एकुण एच. आय. व्ही बाधितांची संख्या २३१ एवढी आहे. हे प्रमाण १४-१५ मध्ये ०.४% होते ते आता ०.२% इतके कमी झाले आहे.

- राहुल भालेराव
जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, पालघर

कुस्तीपटू लक्ष्मी पवार यांना चांगभलं संस्थेची ५१ हजारांची देणगी; आ.सतीश चव्हाण यांनी स्वीकारले पालकत्व

औसा/प्रतिनिधी

औसा तालुक्यातील खानापूर तांडा येथील कुमारी लक्ष्मी पवार या कुस्ती पटू मुलीने आपल्या प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन कुस्तीमध्ये राज्यपातळीवर उज्वल यश संपादन केले आहे. खेलो इंडिया च्या माध्यमातून कुस्तीगीर लक्ष्मी पटू ऑलम्पिक मध्ये जाणार असून तिला पुढील प्रशिक्षणासाठी पूर्वतयारी करण्यासाठी औसा येथील चांगभलं सेवाभावी संस्थेच्या वतीने ५१ हजार रुपयांची देणगी देण्यात आली खानापूर तांडा येथे भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर शिवसेना नेते बजरंग दादा जाधव आणि माजी खा. डॉ सुनील गायकवाड यांच्या हस्ते कुमारी लक्ष्मी पवार हिचा सत्कार करण्यात आला चांगभलं सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सोनाली गुळबिले यांनी पुढाकार घेऊन कुमारी लक्ष्मी पवार साठी मदतीचा हात पुढे केला. तसेच औसा शहरातील नागरिकांनीही अर्थसहाय्य केले आहे. पुढील काळात लक्ष्मी पवार हिच्या क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी चे पालकत्व पदवीधर मतदारसंघाचे आ.सतीश चव्हाण यांनी पालकत्व स्वीकारले असून आता लक्ष्मी पवार या कुस्तीपटू चे ऑलम्पिक मध्ये प्रवेश करण्यासाठीचा मार्ग सुकर झाला आहे. खानापूर तांडा येथे आयोजित कार्यक्रमात अनेक मान्यवरांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:14 PM Page 1

नीती आयोगाच्या शिफारसी आणि सूचना राज्याच्या कृषी विकासासाठी मार्गदर्शक –कृषीमंत्री दादाजी भुसे

मुंबई/प्रतिनिधी

राज्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नीती आयोगाने केलेल्या शिफारसी आणि सूचनांबाबत कृषी विभाग सकारात्मक आहे. पुढील वर्षात यासंदर्भातील सूचनांवर कृषी आणि संलग्न विभाग एकत्रित मिळून काम करतील. या शिफारशी आणि सूचना राज्याच्या कृषी विकासासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरतील, असे कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. नीती आयोगामार्फत मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे आणि मंत्रिमंडळापुढे 'कृषी आणि संग्लन क्षेत्रासाठी धोरण' या विषयावर सादरीकरण केले होते. त्यावेळी कृषी आणि संलग्न विभागाची स्वतंत्र बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

कृषीमंत्री श्री. भुसे म्हणाले, राज्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नीती आयोगाने केलेल्या शिफारसी आणि सूचनांबाबत कृषी विभाग सकारात्मक आहे. नीती आयोगाने निदर्शनास आणलेल्या राज्याच्या कृषीक्षेत्राच्या विकासदराविषयी सकारात्मक विचार करुन राज्य शासन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. नीती आयोगाच्या शिफारशी आणि सूचना राज्याच्या कृषी विकासासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरतील. तालुकास्तरावरील कृषी विकास दर आणि उत्पादकतेतील फरकाबाबत इतर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासंदर्भात उपक्रम राज्य शासनाने सुरु केला आहे. राज्यातील कृषी विद्यापीठांच्या संशोधनाप्रमाणे जे शेतकरी स्वयंप्रेरणेने संशोधन करुन शेतीचा विकास करत आहेत अशा जवळपास ५ हजार शेतकऱ्यांचे मार्गदर्शन इतर शेतकऱ्यांना देण्याचा उपक्रम राज्य शासनाने हाती घेतला आहे. त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत. अशी माहिती यावेळी भुसे यांनी दिली. कृषी मंत्री श्री. भुसे यांनी राज्य शासन राबवित असलेले योजनांची माहिती देऊन कोरोना संकट काळात अनेक शेतकऱ्यांचा पिक घेण्याच्या पद्धतीत बदल करण्याकडे कल दिसून आला असल्याचे सांगितले. कोरोना काळात कृषी विभागाने चांगले काम केले आहे. सोयाबीनचे विक्रमी उत्पादन झाले असून चांगला दरही मिळाला आहे. ते म्हणाले, कृषी क्षेत्रात गावपातळीवर महिलांचा सहभाग मोठा आहे. त्यामुळे कृषी योजनांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा मानस असून केंद्र सरकारनेही याबाबत विचार करावा. अनेकदा कीटकनाशकांची किंमतीपेक्षा कमी किंवा जास्त दरात विक्री होत असल्याचे आढळून येते. यावर आळा घालण्यासाठी कीटकनाशक दराबाबत अधिक कठोर नियम आणि कायदे असण्याची अपेक्षा श्री. भुसे यांनी व्यक्त केली. कृषीमंत्री भुसे म्हणाले, ग्राहक न्यायालयात शेतकऱ्यांच्या तक्रारींचा निश्चित कालावधीत निपटारा व्हावा यासाठी आवश्यक सुधारणा कराव्यात. फळ निर्यातीसाठी मार्केटिंग आणि जाहिरातीसाठी निधीची उपलब्धता व धोरण तयार व्हावे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत शेतकऱ्यांना अवजारासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल. वातावरणीय बदलामुळे राज्यातील बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. या नुकसानग्रस्त बागायतदारांना शेड-नेट, पॉली कव्हर आदी मदत देण्याबाबत योजना सुरु करावी. खर्चाचे नियम (कॉस्ट नॉर्म्स) दरवर्षी निश्चित करावे. शेतमजूरांसाठी विमा संरक्षण देण्यासंदर्भात केंद्रीयस्तरावर उपाययोजना कराव्यात तसेच भरड धान्यासाठी प्रायोजित योजना असाव्यात अशा विविध मागण्या कृषी मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी नीती आयोगाकडे केल्या. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासनाच्या योजनांची माहिती देऊन भविष्यातील दृष्टीकोनही श्री.भुसे यांनी विषद केला. नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद यांनी राज्याचे सादरीकरण चांगले झाल्याचे सांगून भविष्यात कृषीक्षेत्रा पुढील आव्हाने वाढणार असल्याचे सांगितले. रोजगार वाढीसाठी कृषी संग्लन उद्योगांना चालना देण्याची गरज आहे. वातावरणीय बदलाचाही कृषीक्षेत्रावर प्रभाव पडणार आहे. मानवी आरोग्याच्या दृष्टीकोनातून सेंद्रिय शेतीवर लक्षकेंद्रीत करणे गरजेचे आहे. या सर्व बाबीसाठी कृषीक्षेत्रात दिर्घकालीन नियोजन करण्याची गरज प्रा. रमेश चंद यांनी यावेळी व्यक्त केली. बैठकीला जलसंपदा मंत्री जयंत पाटील, फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे, मृद व जलसंधारण विभागाचे अपर मुख्य सचिव नंदकुमार, पणन विभागाचे प्रधान सचिव, नीती आयोगाच्या वरिष्ठ सल्लागार ना रॉय, कृषी आयुक्त पंकज कुमार आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले यांनी राज्याच्या कृषी क्षेत्र विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली.

आंतर जिल्हा चोरट्यास अटक सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर जिल्ह्यात करमाळा परिसरात चोऱ्या करणाऱ्या एका आंतरजिल्हा चोरट्यास सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले असून त्याच्याकडून सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अक्षय यादव पवार (१९ रा. बारडगाव सुद्रिक, ता. कर्जत) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर पोकर्ण उर्फ पुकऱ्या अभिमान काळे हा अद्याप फरार आहे. अटकेतील आरोपीकडून स्विफ्ट कार (एमएच १२ जेएम १२७२) व दोन मोबाईल हॅन्डसेट असा सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. करमाळा हद्दीमध्ये घरफोडीच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले होते. त्या अनुषंगाने घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते व अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना दिले होते. त्यानुसार पथकाने करमाळा हद्दीतील घरफोडीत झालेल्या ठिकाणांना भेट देऊन गुन्ह्याचा तपास सुरू केला पथक गस्त घालत असताना गेलेल्या मुद्देमालासह संशयित इसम राशिन गावातील बसस्थानक परिसरात थांबला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने पवार यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या दोन मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली कार असा सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचा आणखी एक साथीदार पोकर्ण काळे हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे. आरोपीकडून घरफोडीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. अटक आरोपी हा सराईत गुन्हेगार आहे. करमाळा पोलीस ठाण्यात गुरनं.

६८५/२०२१ भादंवि कलम ३८०, ४५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. कर्जत पोलीस ठाण्यात गु र नं ४०१/२०२० भा दं वि कलम ४६१, ३८० प्रमाणे, गुरनं ११५६/२०२० भादंवि कलम ३८०, ४५७ प्रमाणे दोन गुन्हे दाखल आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, सहाय्यक फौजदार बिराजी पारेकर, पोलीस अंमलदार रवी माने, सलीम बागवान यांनी केले आहे.

भिवंडीत पोलिसांच्या छापेमारीत तब्बल ४० बांग्लादेशी नागरिकांचे वास्तव उघड

भिवंडी/प्रतिनिधी

भारतात छुप्या मार्गाने येवून भिवंडी शहरात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना शहरातील विविध भागात शांतीनगर, नारपोली आणि भिवंडी शहर पोलिसांनी छापेमारी करून तब्बल ४० बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. विशेष म्हणजे १० दिवसापूर्वीच भिवंडीतील अवनी टेक्सटाईल्समध्ये काम करणाऱ्या ९ बांग्लादेशी नागरिकांना कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून टक करण्यात आली होती. त्यामुळे भिवंडी व आसपासच्या भागात आणखीही बांगलादेशी नागरिक राहत असल्याची शक्यता असल्याने ठाणे व मुंबई जिल्ह्याच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. शांतीनगर, नारपोली आणि भिवंडी शहर पोलीस पथकला बांगलादेशी नागरिक भारताचा अधिकृत पारपत्र किंवा भारत देश किंवा बांगलादेशाचा विजा नसताना पैसे कमावण्याच्या उद्देशाने छुप्या मार्गाने दलालाच्या मदतीने बांगलादेशातून हावडा रेल्वे स्टेशन येथे येवून रेल्वेने प्रथम कल्याण व नंतर भिवंडीत अनधिकृतपणे वास्तव्यास राहून भिवंडीच्या विविध भागात असल्याची खबर दिली. त्यांनतर तिन्ही पोलीस ठाण्याच्या पथकाने विविध ठिकाणी छापेमारी केली असता ४० बांग्लादेशी नागरिक आढळून आले आहे. या दरम्यान या ४० जणांनी बनावट पॅनकार्ड व आधार कार्ड तसेच पोस्ट ऑफिसचे पास बूक मिळवून ते शासनास खरे असल्याचे भासवून सुविधा मिळवण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगण्यात आले आहे. शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून २०, भिवंडी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १० तर नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत असे ४० बांगलादेशींना ताब्यात घेऊन अटक केली आहे. तर ४० बांगलादेशी नागरिकाच्या अटकेने भिवंडी मोठ्या प्रमाणात बांगलादेशी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर ४० अटक बांगलादेशीकडून २८ मोबाईल व ९४ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याची माहिती भिवंडी झोनचे डीसीपी योगेश चव्हाण यांनी दिली आहे.

सोलापूर विजयपूर महामार्गावरील टाकळी येथे कर्नाटकातून येणाऱ्यांची तपासणी सुरु

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

ओमीक्रोन व्हेरियंटचे रुग्ण कर्नाटकात आढळल्याने सोलापूर जिल्हा प्रशासन अलर्ट झाले आहे. सोलापूर विजयपूर महामार्गावरील टाकळी येथे आंतरराज्य सीमेवर कर्नाटकातून येणाऱ्या प्रवाशांची आजपासून तपासणी सुरू करण्यात आली आहे. आरटीपीसीआर टेस्ट व दोन लसीकरण झालेल्या प्रवाशांनाच सोडले जात आहे.ही तपासणी चोवीस तास राहील अशी माहिती मंद्रूपचे अपर तहसीलदार राजशेखर लिंबारे आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.नितीन थेटे यांनी दिली. अपर तहसीलदार लिंबारे, सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. थेटे, नायब तहसीलदार जितेंद्र मोरे, आरोग्य विभागाचे कर्मचारी आज सकाळीच टाकळी येथील तपासणी नाक्यावर आले. त्यांनी कर्नाटकातून महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी सुरू केली. संपूर्ण देशात चर्चेचा विषय असलेल्या कोरोना ओमीक्रोन व्हेरियंटचे गुरुवारी दोन रुग्ण कर्नाटकात आढळल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जाहीर केली. त्यामुळे सोलापूर जिल्हा प्रशासन अलर्ट झाले. सोलापूर जिल्ह्यात कर्नाटकातुन येणाऱ्या प्रवाशांना आरटीपीसीआर टेस्ट आणि लसीकरण बंधनकारक करण्यात आल्याची माहिती काल सहायक जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली होती. त्यांनी कर्नाटकातून महाराष्ट्रात येणाऱ्या प्रमुख महामार्गावर तपासणी नाके सुरू करण्याचे आदेश दिले. त्यानुसार तहसीलदार लिंबारे व सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.थेटे यांनी टाकळी येथे तपासणी सुरू केली आहे. महसूल विभागाचे कर्मचा-यारी तर मंद्रूप पोलीस ठाण्याचे अधिकारी व पाच ते सहा कर्मचारी या तपासणी नाक्यावर आहेत. दिवस-रात्र येथे कर्नाटकातून येणाऱ्या प्रवाशांना त्यांची तपासणी करूनच महाराष्ट्राच्या हद्दीत प्रवेश दिला जात आहे. ज्यांनी लसीकरण केले नाही किंवा टेस्ट रिपोर्ट निगेटिव नाही, ज्यांनी मास्क परिधान केले नाही त्यांना परत पाठविले जात होते. सध्या राज्यातील एसटीचा संप सुरू असल्याने कर्नाटकातील अनेक बसेस टाकळी येथूनच परत जात आहेत.

मिताली बागुल यांच्या हस्ते व्हीलचेअर, शिलाई मशीन आणि ब्लँकेटचे वाटप

वाडा/प्रतिनिधी

तालुक्यातील खानिवली येथील चंदावरकर हायस्कुल येथे रविवारी (दि.५ डिसेंबर) पालघर जिल्हा परिषदेच्या सदस्या मिताली बागुल यांच्या हस्ते विविध उपयुक्त साधनांचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ मुंबई कलाकार यांच्या वतीने आदिशक्ती ज्ञान प्रसारक मंडळाचे संचालक कमलाकर पाटील यांच्या सहकार्याने पाच अपंगांसाठी व्हीलचेअर व शिवनक्लास साठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. खानिवली नाक्यावरील शिवणक्लासचे उद्घाटन मिताली बागुल यांच्या हस्ते पार पडले तर भागीरथी भोईर सामाजिक प्रतिष्ठान तर्फे कोरोना काळात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सागर पाटील व संतोष निखुर्डे यांना कोरोना योद्धा म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच परिसरातील गरजवंतांना ब्लँकेट, मूग पाकिटे व फळांचेही वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी निवृत्त नायब तहसीलदार ए. डी. पाटील यांनी विशेष सहकार्य केले.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'ई' नालासोपारा पश्चिम, मुख्य कर्यालय-विरार

दुरध्वनी : १२२५०-२४०२१७९/२४०२५६३

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	रिसीट नं.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-७	NL30/318/31	१८२०	अमित नंदलाल झवेरी	प्रकाश त्रिनाथ साहु व प्रफेश त्रिनाश साहु
२.	निळेमोरे-७	NL30/386/134	१८१७	अभिजित सी मोरे व चंद्रकांत जे मोरे	शनि रविशंकर पांडे व बबीता रविशंकर पांडे
३.	निळेमोरे-७	NL30/318/25	१८२१	रामदुलाल घोषव स्वपना राम घोष	जयशंकर वैश्य
४.	निळेमोरे-७	NL30/318/86	१८१९	नामदेव विठोबा माळी व सुलोचना ना. माळी	नायर आशा दासन
५.	निळेमोरे-५	NL28/110/1	१४०३	अजय प्रताप सिंग	रामेन्द्र प्रताप सिंह
६.	निळेमोरे-६	NL29/153/25	१८७७	फरीद मेहबूब शेख	आरिफ कय्युम खान
७.	निळेमोरे-६	NL29/161/53	१८७८	राजेश बी. म्हामुणकर	अख्तर जमाली व सानोलार दरखंशा अख्तर जमाली
८.	निळेमोरे-६	NL29/179/357	१८४७	संस्कृती बिल्डर्स ॲण्ड डेव्ह.	गीतादेवी जी.गुप्ती व मनोजकुमार जी. गुप्ता
९.	निळेमोरे-७	NL30/306/6	१८०५	राकेश नागराज चौहाण	प्रियंका राकेश चौहाण
१०.	निळेमोरे-७	NL30/343/66	१८०७	प्रशांत दिनकर परब	नागसेन गणपत मोहिते व अर्चना मोहिते
११.	निळेमोरे-७	NL30/4/7	१९४९	नजीब ईस्माईल खान	
१२.	निळेमोरे-७	NL30/376/91	१९२९	फातिमा डॅनिस रॉड्रिग्ज	प्रविण कुमार बसप्पा उध्यावर
१३.	निळेमोरे-७	NL30/301/2	१९१६	तेज डेव्ह.	प्रकाश घनश्याम यादव व रिना प्रकाश यादव
१४.	निळेमोरे-७	NL30/303/42	१८८९	मे. युनिक कंन्स्ट्रक्शन	विनोद बापू माने
१५.	निळेमोरे-६	NL29/174/18	१९३२	नितीन रोकडे	राजेश कैलास सरोदे
१६.	निळेमोरे-६	NL29/155/248	१९०७	शैलेश डांगे	नारायण हरी मौर्य
१७.	निळेमोरे-६	NL29/200/126	१८९१	संस्कृती बी. रिकामे	सुनिलकुमार के.पांण्डेय व सुरेख सुनिलकुमार पांण्डेय
१८.	निळेमोरे-५	NL28/62/6	१९३५	अरुण गोडबोले	नहिद मोहम्मद सलीम कोत्सावाला
१९.	निळेमोरे-७	NL29/179/353	१९३६	संस्कृती बिल्डर्स ॲण्ड डेव्ह.	पुरुषोत्तम खोडा मकवाना व खोडा रामहणड मकवाना
२०	निळेमोरे-७	NL30/349/79	१९३८	रत्नाकर रमेश कांबळी	बाबुसिंग करणसिंग खरवड व पवनकुवर बाबुसिंग खरवड
२१.	निळेमोरे-७	NL29/141/92	९८१	वसंत शेट्टी	विनोद दिनानाथ मूरकर व अर्चना विनोद मूरकर

जावक क्र.: वविशम/कवि/७६५/२०२१-२२
दिनांक : ०९/१२/२०२१

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:15 PM Page 1

पान १ वरून....

प्रियकरावर बलात्काराची केस टाकून...

चारित्र्यावर संशय घेऊ लागला होता कारण दोन मुलाच्या जन्मानंतर तिच्या वागण्यात राहणीमानात त्याला फरक जाणवू लागला होता. दारूच्या नशेत घरात येवून तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करू लागला होता. त्याचा हा त्रास तिला असह्य वाटू लागल्याने ती गेल्या ७ वर्षापूर्वीच आपल्या दान्ही मुलांना घेऊन तासगाव येथे आपल्या माहेरी आली होती. घरात तिचे आई वडिल भाऊ भावजेय होते.ती दोन मुलांना घेऊन येवून माहेरी राहू लागल्याने माहेरी ही तिच्या घरी भांडणे होऊ लागली होती. म्हणून तिच्या आई वडिलांनी तिला आणि तिच्या दोन्ही मुलांना एका दुसऱ्या घरात ठेवले. ती आपल्या दोन्ही मुलांना आई वडिलाकडे ठेवून कामावर जात होती. कामावर तिला चांगले पैसे मिळत होते. त्यातून तिचा उदरनिर्वाह चालत होता. तिचे पोट पाणी चालू होते. तिच्या पोटाची आग विझत होती. पण रात्रीच्या वेळी तिच्या जवानीची तगमग वाढून पोटाच्या खालची आग विझत नव्हती. नवऱ्याच्या सुखापासून वंचित राहिलेल्या निर्मलाला आता कोणी तरी पुरूष ती आग विझविणेवाठी पाहिजे होता.त्यातच तिच्यावर गल्लीतच राहणार योगेश भोसले नावाचा तरूण लाईन मारत होता. त्याला ती नवऱ्यापासून वेगळी राहत आहे. तिची ती गरज आपण भागवू शकतो हे त्याने ओळखले असल्याने तो तिच्याशी लगट करीत तिच्याशी लाडीगोडी लावत होता. तिच्याशी गप्पा मारताना तो तिला कामूक इशारे करत होता. त्याचा इशारा तिने ओळखला असल्याने ती ही त्याला सिग्नल देत होती. त्यातूनच त्या दोघांना जवल यायला वेळ लागला नाही. दोन मुले झाले असली तरी निर्मलाची जवानी ही चारचौघात उठून दिसणारी होती. याचाच गैरफायदा घेत योगेश याने तिला आपल्या अंगाखाली घेऊन तिची जवानी ओरबडली होती. तिला ही आता त्याचा सहवास सारखा हवा हवासा वाटू लागल्याने ती त्याला त्या कामासाठी सारखे बोलवू लागली होती. समाजाच्या कुंटूंबाच्या नजरेपासून ते दोघे इष्काचा खेळ खेळू लागले होते. योगेश हा बोलोरा पिकअप गाडी चालवित होता. त्यातून त्याला चांगले पैसे मिळत होते. तो सगळा पैसा तिच्यावर खर्च करीत होता. ती माहेरी ही वेगळी राहत असल्याने रात्रीच्या वेळी तो दारू पिऊन येवून निर्मलाकडे राहत होता. तिची ती गरज पूर्ण करून तो सकाळी जात असल्याने त्या दोघाच्या त्या संबंधाची कल्पना शेजाऱ्याना नातेवाईकांना आली होती. पण ते काही तिला बोलत नव्हते. त्यांनी ही त्याच्या त्या संबंधाला मुक संमती दिली होती. त्या दोघांचे ते संबंध गेल्या चार पाच वर्षापासून सुरू होते. अलिकडे मात्र योगेश हा तिला खर्चासाठी पैसे देत नव्हता. फक्त तिच्या शरीराचा उपभोग घेऊन जात होता. त्यामुळे त्या दोघात ही दररोज भांडणे होत होती. तो तिला पैसे देत नसल्याने ती त्याला आपल्या अंगाला हात लावू देत नव्हती. तिने त्याला आपल्या राणीची अशी काही चटक लावली होती की, तो तिच्यापासून लांब राहु शकत नव्हता. त्याला ती आता फुकट वापराला पाहिजे होती. ती मात्र चालू असल्याने तिने त्याचा विचार ओळखला होता. म्हणून ती त्याचेबरोबर पैसे घेतल्या शिवाय अंगाला हात लावू देतच नव्हती. दोघातील भांडणे विकोपाला गेले होते. ती आपली रखेल आहे. आपण तिला बायको सारखे प्रेम दिले आहे.त्यामुळे आपण तिच्यावर जबरदस्ती करू शकतो असे त्याला वाटत होते. म्हणून गेल्या दोन वर्षापूर्वी तो दारूच्या नशेत तिच्या घराकडे आला होता. तिची दोन्ही मुले झोपली होती.तो तिला जवळ घेऊन आपल्या अंगाखाली घेऊ इच्छित होता.पण ती त्याच्याकडे पैसे मागत होती. तो तिला पैसे दोन दिवसांनी देतो आता माझ्याकडे नाहीत मला सुख दे. म्हणत तिच्यावर जबरदस्ती करीत तिच्याबरोबर झोपला. ती त्याला विरोध करीत होती. पण तो काही तिचे ऐकत नव्हता. त्याने जबरदस्तीने तिच्याकडून सुख घेतले होते. त्यावेळी ती गप्प बसली होती. त्यानंतर ही त्याने असाच प्रकार करण्याचा प्रयत्न केला असता तिने त्याला धडा शिकविण्यासाठी म्हणून पोलीसात त्याचेविरूध्द बलात्काराची केस दाखल केली. तिच्या तक्रारीवरून पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचे विराधात कोर्टात केस दाखल केले. येथेच त्या दोघाच्या नात्यात वितुष्ट आले. दोन तीन महिन्यांनी त्याला या केसमधून जामीनही मिळाला.पण कोर्टात केस चालू असल्याने प्रत्येक तारखेला त्याला जावे लागत होते. त्यात त्याचे पैसे ही खर्च होत होते. शिवाय मानसिक त्रास ही होत होता. म्हणून तो निर्मलाला भेटून माझ्यावरची केस परत घे. मी काही तुझ्यावर बलात्कार केला नाही, तुझ्या माझ्या सहमतीनेच सगळे काही घडत होते. तू मला नाहक त्रास देवू नकोस असे सांगत होता. पण ती मात्र त्याचे काही ऐकत नव्हती. ती आता चार घरचे पाणी पिली असल्याने चांगलीच धुर्त निघाली होती.ती उलट त्याचेबरोबर भांडण काढत मी काही तुझी लग्नाची बायको नाही तुझ्याबरोबर फुकट झोपायला म्हणत त्याला बाहेरचा रस्ता दाखवत होती. तुझ्यासारखे छप्प लोक मला ठेवायला आणि माझ्यावर पैसे खर्च करायला तयार आहेत म्हणत ती त्याला जवळ ही येवू देत नव्हती. ती आपल्याला विनाकारण त्रास देवून कोर्टाची पायरी दाखविली आहे म्हणून तो तिच्यावर जाम चिडला होता. बलात्काराची केस तिने त्याचेवर सन २०१५ साली घातली होती.तेव्हापासून तो तिच्यावर डुख धरून होता. तिच्या सहमती शिवाय ती केस काही मिटत नव्हती.उलट ती केस काही माघार घ्यायला तयार नव्हती.तिला फक्त पैसा पाहिजे होता. म्हणून ती त्याला या प्रकारे त्रास देत होती.यातून काय करायचे काय नको असे योगेशला झाले होते. कधी एकदा हिच्यापासून आपली सुटका होते असे त्यांला वाटत होते. तो तिला सारखा भेटत होता.पण ती काही नमत नव्हती. दि.२९ नोव्हेंबरला ती तासगावला काही कामानिमत्य आली. त्यावेळी तिची भेट योगेश भोसले बरोबर झाली. तो आपली बोलोरो पिकअप गाडी क्र.एम एच ०९.४२४५ ने भाडे करत होता. ती त्याला भेटल्याने त्याने लवकरच ते भाडे केले. तिला गोड बोलून आपल्या गाडीत घेतले. ते दोघे ही वासुंबेला जाण्यासाठी आरफळ रस्त्याने निघाले. त्या दोघांचे संबंध असल्याने ती बिनधास्त गाडीत बसली होती. मध्येच त्याने गाडी रस्त्यावर थाबविले. तो तिला माझ्यावरची केस माघार घे. म्हणत होता. तुला मी पैसे देतो पण मला त्रास देवू नकोस असे सांगत होता. तिचा मात्र त्याचेवर विश्वास नव्हता. तो काही पैसे देणार नाही याची तिला गॅरेटी होती. म्हणून ती त्याला म्हणाली, तुझी गाडी माझ्या नावावर कर म्हणाली यातून त्या दोघांत वाद सुरू झाला. ती त्याला नको नको ते बोलत होती. त्याचे भांडण वाढले होते. भांडणात त्याला राग अनावर झाला. त्यातच त्याने गाडीतील दोरी काढली आणि नको ती ब्याद म्हणत तिच्या गळ्याभोवती टाकत तिचा गळा जोरात आवळला. ती त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी धडफडत होती. ताकद लावत होती पण त्याच्या ताकदीपुढे कमी पडू लागल्याने काही वेळातच तिची हालचाल मंदावली. ती शांत झाली ती कायमचीच. तिचा आपल्या हातून मृत्यू झाला आहे हे लक्षात येताच तो भांबवला. त्याने काही वेळ विचार केला. रात्रीच्या अंधारात त्याने तशीच गाडी पुढे नेली. पुढे आरफळ कालव्यानजीक त्याने तिचा मृतदेह गाडीतून काढून निर्जन ठिकाणी टाकला. आणि तेथून तो परत फिरला. दुसऱ्या दिवशी सकाळी लोकांना एका महिलेचा गळा दाबलेल्या अवस्थेत मृतदेह दिसल्यावर लोकांनी या घटनेची माहिती तासगाव पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. गर्दीतील लोकांनी त्या महिलेला ओळखल्याने मयत महिलेची ओळख पोलीसांनी निर्मला अजय उर्फ खंडू चव्हाण अशी पटवली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठविला. या घटनेचा पोलीस वेगवेगळ्या ॲगलने तपास करत असताना मयत निर्मलाचे विवाहबाहय संबंध हे योगेश भोसले बरोबर असल्याचे व तिने त्याचे विरूध्द बलात्काराची केस दाखल केली असल्याचे समजल्यावर पोलीस संशयीत योगेश भोसले याचा शोध घेत होते. परंतु तो घटनेनंतर पसार झाला होता. त्याच्या मोबाईल कॉलचे डिटेल्स आणि कॉल लोकेशन तपासत असताना तो पोलीसांना पाच दिवसांनी मिळून आला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचेकडे निर्मलाच्या खूनाची चौकशी करत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला होता.पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.मयत निर्मला हिच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी निर्मला अजय उर्फ खंडू चव्हाण(वय३२) रा.आष्टा.आता वासुंबे हिच्या खून प्रकरणी योगेश नंदकुमार भोसले (वय ३२) रा.डबाझ गल्ली तासगाव याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला तासगाव येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला ७ डिसेंबरपर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली बोलोरा गाडी व दोरी जप्त केली. या घटनेचा तपास डीवायएसपी अश्विनी शेंडगे, पोलीस निरीक्षक संजय झाडे, याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी.नितीन केराम,पो.उप. निरी.संदीप गुरव, पो.हवा.सतिश लाटणे, पो.ना.संदीप गंडे, पो.ना.सागर लवटे, पो.ना. विलास मोहिते, समीर आवळे, सतीश खोत, हणमंत गवळी, विनोद सकटे दत्तात्रय जाधव, अशोक सुर्यवंशी, प्रकाश पाटील गुंडवडे, सायबर सेलचे जितेंद्र चव्हाण, महादेव हसबे, महेश मासाळ याच्या पथकाने करून संशयीत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. विवाहबाहय संबंधात अडकलेली महिला ही कोणत्या ही थराला जात असते त्यातूनच अशा घटना घडतात हेच दिसून येते.

चोराचा पाठलाग करताना अंदाज...

शिपाई किसन शेजवळ बोलतोय. हा बोला शेजवळ. सर मानखुर्द रेल्वे स्टेशनच्या ब्रिज वर एका तरुणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आहे. तुम्ही तातडीने या. फोनवर मिळालेल्या माहितीनुसार ठाणे डायरीमध्ये नोंद ठाणे अंमलदार भिंगारदिवे ही माहिती वाशी रेल्वे स्टेशनचे वपोनी विष्णू केसरकर यांना देतात. ते आपले सहकारी पोलीस निरीक्षक प्रवीण पडवी, महिला पोलीस निरीक्षक मोनाली घरटे, सपोनि मच्छिंद्र लाड,पोलीस उप निरीक्षक आबासाहेब भिंगारदिवे, एएसआय दिलीप खोतकर, नलावडे, पो.हवा.पाटील, पो.ना.देवेंद्र पाटील, इनामदार, पो. कॉ.हांडे, शिंदे, दराडे यांच्या सह घटनास्थळी दाखल होतात. घटनास्थळी त्यांना एक तरुण रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला दिसतो. पोलिसाचे प्रथम कर्तव्य म्हणून ते तातडीने प्रथमोपचार करण्यासाठी त्याला राजावाडी रुग्णालयात दाखल करितात. डॉक्टर तपासून सदर तरुणाला मृत घोषित करतात. त्यानंतर पोलीस पथक घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून प्रेत पीएम साठी रवाना करतात. या प्रकरणी वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात गु .र.क्र. १६०/२०२१ कलम ३०२, ३९७ भादंवि सह कलम म.पो.का. ३७ (१), १३५ प्रमाणे दिनांक २०/११/२०२१ रोजी दुपारी १:३० दरम्यान वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई किरण मुरारजी शेजवळ, (२६) यांच्या फिर्यादी वरून अज्ञात एसमा विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करतात. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास सुरू होतो. तपासात घटनास्थळी आढळून आलेल्या बॅगेत आधार कॉर्ड व पॅन कार्ड मिळून आलं होतं. त्या दोन्ही कॉर्ड्सवर चेंबूरचा पत्ता आढळून आला होता. त्यामुळे वाशी पोलिसांनी चेंबूर पोलिसांना फोन करून तो पत्ता शोधून काढण्यास सांगितले . चेंबूर पोलिसांनी सदर पत्यावर जाऊन चौकशी केली तेव्हा या पत्यावर राहत असलेले लोक नवी मुंबईच्या खारघर येथे राहतात. असे शेजाऱ्यांनी सांगितले. वाशी पोलिसांचे एक पथक तातडीने नवी मुंबई येथील रो-होऊस नं.२० प्लॅट न.ए/४२ दत्त मंदिर रोड खारघर येथे रवाना झाले. या पथकाने मृत तरुणाची आई व भावाची भेट घेऊन त्यांना थोडक्यात घटनाक्रम सांगून पोलीस ठाण्यात येण्याची विनंती केली. त्यानुसार ते दोघे मायलेक पोलीस स्टेशनला गेले. यावेळी पोलिसांनी मृत तरुणाच्या हातात मिळून आलेली बॅग आणि त्यातील आधारकार्ड व पॅन कार्ड दाखवले. तेव्हा त्या मायलेकांनी ते ओळखले. ही बॅग आणि त्यातील कागदपत्रे माझा मुलगा दीपक हिरे याची असल्याचे सांगितले. पोलीस पथक त्या मायलेकांना राजावाडी रुग्णालयात घेऊन गेले. तेथे शवागृहात ठेवलेलं प्रेत त्यांना दाखविले. मुलाचा मृतदेह पाहून त्या ऑक्सबोक्शी रडू लागल्या. साहेब हा माझा मुलगा दीपकच आहे. असे सांगून मृतदेहाची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर ते प्रेत कुटुंबातील सदस्यांच्या ताब्यात देण्यात आले. दीपक हिरे (वय २९) असे मृत तरुणाचे नाव असून तो नवी मुंबई येथील रो-होऊस न.२० प्लॅट न.ए /४२ दत्त मंदिर रोड खारघर येथे आई आणि भावासह राहत होता. दीपक साडी विकण्याचा व्यवसाय करीत होता. त्यासाठी तो गुजरातच्या सुरत मधून होलसेल भावांत साडी आणून मुंबईत विकत होता. २० तारखेला पहाटे तो सुरतला जाण्यासाठी घरातून बाहेर पडला. असे त्याच्या आईने पोलिसांना सांगितले. वाशी लोहमार्ग पोलीस गुन्ह्याचा तपास करीत असतांना लोहमार्ग गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांचे पथक आरोपीचा माग काढत रेल्वे स्टेशन परिसरात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या आरोपी कडून या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीचा कुठे काही सुगावा लागतो काय म्हणून ते शोध घेत होते. त्यांना तसा सुगावा लागला होता. मात्र मुंबई गुन्हे अन्वेषण विभाग कक्ष ६ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारे पोलीस निरीक्षक ननावरे यांना त्याच्या गुप्त बातमीदार याच्या कडून या गुन्ह्यातील आरोपीची इत्यभूत माहिती मिळाली होती. खबर एकदम पक्की असल्याने लोहमार्ग पोलिसांचे पथक आरोपीच्या घरी पोहचण्यापूर्वीच मुंबई गुन्हे शाखेच्या चेंबूर युनिटने नवी मुंबई येथील घरातून संशयित आरोपी पप्पु कुंजी शेख उर्फ साकेत अर्फ रमजान (वय ३०), धंदा पेटींग, रा. कोपरा गाव मामा पाणी चाळ, पहीला माळा, हनुमान मंदिराजवळ, खारघर मधून ताब्यात घेतले आणि त्याला वाशी रेल्वे स्टेशन पोलिसांच्या ताब्यात दिले. वाशी रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व्ही. डी. केसरकर, पोलीस निरीक्षक प्रवीण पडवी, महिला पोलीस निरीक्षक मोनाली घरटे, सपोनि मच्छिंद्र लाड, पोलीस उप निरीक्षक आबासाहेब भिंगारदिवे यांनी या आरोपीची कसून चौकशी केली तेव्हा त्यांने गुन्ह्याची कबुली दिली. दिपक चंद्रकांत हिरे हा तरुण दिनांक २० नोव्हेंबर रोजी सुरत येथे जाण्यासाठी घरातून बॅग घेऊन बाहेर पडला. त्यानंतर तो खारघर रेल्वे स्टेशनला आला. खारघर मधून लोकल पकडून तो माल डब्यात चढला आणि लोकल प्रवास करू लागला. याच दरम्यान आरोपी पप्पु कुंजी शेख उर्फ साकेत अर्फ रमजान हा सानपाडा रेल्वे स्टेशन मधून त्याच लोकल मधील माल डब्यात चढला. पहाटेची वेळ असल्याने माल डब्यात गर्दी नव्हती. याच संधीचा फायदा घेऊन आरोपी पप्पु कुंजी शेख याने चाकूचा धाक दाखवून दिपक हिरे याचा मोबाईल हिसकावून घेतला. तो मोबाईल मिळवण्यासाठी दिपकचा आटापिटा सुरू होता. दीपक आरोपीकडे मोबाईल परत मागत होता. पण तो देत नव्हता. दीपक ही त्याचा पिच्छा सोडायला तयार नव्हता. आरोपी हा सराईत गुन्हेगार होता. त्याच्यावर चोरी, जबरी चोरी, विनयभंग, मारामारी करणे असे गुन्हे आरसीएफ व मानखुर्द पोलीस ठाण्यात दाखल आहेत. त्यामुळे तो उन्मत झाला होता. दिपक मोबाईल परत परत दे असे म्हणत होता तर तो पुढे आला तर चाकूने भोसकून टाकीन अशी धमकी देत चाकु फिरत होता. हा खेळ जवळजवळ मानखुर्द रेल्वे स्टेशन येईपर्यंत सुरू होता. मानखुर्द रेल्वे स्टेशन येताच गाडी थांबली. तसाच आरोपी गाडीतून उतरून पळू लागला. दिपकने त्याचा पाठलाग सुरू केला. आरोपी पुढे दिपक त्याच्यापाठी धावू लागला. दिपकने फलाटावर गाठून आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा तो प्रयत्न फसला. दीपक आपला पिच्छा सोडत नाही हे बघून आरोपी घाबरला. तो चाकूचा धाक दाखवून दीपकला पुन्हा पुन्हा घाबरू लागला. पण दीपक ही इरेला पेटला होता. तो त्याच्या धमकीला भीक न घालता आरोपीचा पाठलाग करत होता. या दरम्यान आरोपीने आपल्या जवळील धारदार चाकूने दिपकच्या पोटात वार केला. तो ताकतीने केलेला वार बरोबर दिपकच्या बरगडीला लागला. तशीच रक्ताची चिरकांडी उडाली. दिपक रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळला. त्यातच त्याची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी वाशी पोलिसांनी आरोपी पप्पु कुंजी शेख उर्फ साकेत अर्फ रमजान याला दि.२० नोव्हेंबर रोजी दीपक हिरे या तरुणाच्या खुनाच्या गुण्यात अटक केली. ही कामगिरी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालीद, पोलीस उप आयुक्त, (मध्य-पश्चिम परिमंडळ), संदीप भाजीभाकरे यांच्या मागदर्शनाखाली वाशी रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व्ही.डी. केसरकर, पोलीस निरीक्षक प्रवीण पडवी, महिला पोलीस निरीक्षक मोनाली घरटे, सपोनि मच्छिंद्र लाड, पोलीस उप निरीक्षक आबासाहेब भिंगारदिवे, एएसआय दिलीप खोतकर, नलावडे, पो.हवा.पाटील, पो ना.देवेंद्र पाटील, इनामदार, पो. कॉ.हांडे, शिंदे, दराडे लोहमार्ग गुन्हे शाखेचे वपोनी गजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक विजय यादव, मुंबई गुन्हे अन्वेषण विभाग कक्ष ६चे प्रभारी पोलीस निरीक्षक रविंद्र सांळुखे, पोलीस निरीक्षक ननावरे व पथक यांनी संयुक्तीकरित्या पार पाडली आहे.

किती दिवस भीत भीत जगायचे ...

माजवणे हा वसीमचा उद्योग होता. तो रहेमान याच्या दुकानावर मटण घेण्यास जात असे मात्र दादागिरी करुन त्याला पैसे देत नव्हता. वेळ प्रसंगी त्याच्या जवळचे पैसे देखील हिसकावून घेत होता. मेहनतीची कमाई वसीम घेऊन जात असल्यामुळे रहेमान प्रचंड संतापला होता. मात्र वसीमची परिसरात असलेली दादागिरी आणि त्याचा मित्रपरिवार पहाता रहेमान हा अनेक दिवसांपासून अन्याय सहन करत आला. या दोघांमध्ये एक महिन्याआधी चांगलाच वाद झाला होता. यावेळी वसीमने अब्दुल याला 'मैं तुझे खतम करूंगा' अशी धमकी दिली होती. या धमकीनंतर रहेमान कमालीचा घाबरला होता. वसीम पठाण आपला गेम करणार याचा अंदाज रहेमानला होता. वसीमचे टेन्शन आल्यामुळे रहेमानचे धंद्यात लक्ष लागत नव्हते आणि रोजच्या धमकीमुळे तो चिंतेत पडला होता. वसीम आता आपल्याला मारुन टाकेल असा भ्रम त्याने मनात निर्माण केला होता. वसीमच्या हातून मरण पत्करण्यापेक्षा आपणच त्याचा खात्मा केला तर बरे होईल असा अघोरी विचार करून अब्दुल रहेमान कामाला लागला. अब्दुल रहेमान आणि वसीम यांचे मित्रत्वाचे संबंध होते, मात्र वसीमच्या दादागिरीमुळे रहेमान त्रस्त होता. वसीम पठाणचा खात्मा केल्यानंतर आपल्या मागची कटकट नेहमीची दूर होईल या आशेने अब्दुलने आपल्या मित्राच्या मदतीने वसीमचा काटा काढण्याचा प्लॅन आखला. दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळी सहा वाजता अब्दुलने वसीमला फोन करून सांगितले कि, 'आज आपण पार्टीला जाऊ, मी तुला जेवण देतो.' त्याच्या या बोलण्याने वसीमला कोणतीही शंका आली नाही, उलट अब्दुल आपल्याला पार्टी देणार, फुकट खायला-प्यायला मिळणार या विचारानेच तो जाम खुष झाला. यानंतर वसीमने आपला मित्र उमेश येरमे याला फोन करून सांगितले की, 'आज रात्री अब्दुल रहेमान आपल्याला पार्टी देणार आहे, तू घरी जेवण करु नकोस, तू जेवण करायला निघून ये.' तो तयार झाला. रात्री ठरल्याप्रमाणे अब्दुल, वसीम आणि उमेश असे तिघे जेवण करण्यासाठी शहराबाहेर असलेल्या हॉटेलकडे निघाले. दरम्यान वाटेतच एक बार लागतो. याठिकाणी तिघांनी मद्यप्राशन केले. यावेळी अब्दुलचे मित्र नितीन पवार, निलेश उईके, छोटू खा आणि नीरज वाघमारे हे बारवर पोहचले. ते अचानक भेटल्याचे अब्दुल दाखवत असला तरी तो त्याच्या कटाचाच भाग होता. ते वसीमला संपवण्याच्या प्लॅनमधील अब्दुलचे साथीदार होते. आधीच ठरल्याप्रमाणे ते बारमध्ये पोहोचले होते. सगळेच एकमेकाला ओळखत असल्यामुळे काही शंका येण्याचे कारण नव्हते. सगळे मिळून गप्पा मारत बसले. त्यांच्यात गरमागरम चर्चा झाली. भरपूर मद्यप्राशन केल्यानंतर सर्व जण हॉटेलकडे जेवणासाठी निघाले. ते हॉटेलमध्ये गेले. जेवणाची ऑर्डर दिली. सर्व जण बसले असता अब्दुल आणि वसीम यांच्यात पुन्हा वाद झाला. दुसऱ्याला दमदाटी करणे ही वसीमची सवय होती. त्यातूनच अब्दुल आणि वसीम यांच्यात वाद झाला. मात्र अब्दुलच पार्टी देणार असल्याने वसीमने जास्त ताणले नाही आणि तो वाद लगेच मिटला. यानंतर सर्वांनी जेवण केले. पण अब्दुल आणि वसीम यांच्यात वाद झाल्यामुळे उमेश येरमे हा काही वेळातच तिथून निसटला. तो चालत पुढे निघून गेला. उमेश याच्याकडे नेहमी धारदार शस्त्र असायचे. सर्व जण जेवण करण्यासाठी मोटरसायकलनेच गेले होते. जेवण आटोपल्यानंतर एका गाडीवर दोघे असा त्यांचा परतीचा प्रवास सुरु झाला. या दरम्यान वसीमची पत्नी निखत वसीम पठाण हिने अनेकदा त्याला फोन करून घरी येण्याची विनंती केली होती. मात्र पार्टी असल्यामुळे मी सध्या येऊ शकत नाही, तू जेवण करून घे' असे त्याने तिला सांगितले. नीरज वाघमारे हा पार्टी देत आहे अशी माहिती त्याने पत्नीला फोनवर दिली होती. पार्टी असल्यामुळे वसीम आता उशिरा घरी येईल असे तिला वाटले. म्हणून ती जेवण करून झोपली. पती बाहेर असल्यामुळे तिला चिंता होतीच. परंतु अनेकदा वसीम उशिरा घरी यायचा. तिला त्याच्या वागण्याची सवय झाली होती. रात्री साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान पोलिसांना दूरध्वनीवरून माहिती मिळाली की, वडगाव येथील पल्लवीला लॉनसमोर दोन तरुणांची हत्या झाली. या माहितीने पोलीस खडबडून जागे झाले. यानंतर पोलीस निरीक्षक मनोज केदारे, पी.एस.आय. नागेश खाडे तसेच पोलीस ताफा तातडीने घटनास्थळी दाखल झाला. वसीम पठाण, उमेश येरमे यांचे मृतदेह रस्त्यावर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले होते. दोन्ही मृतकाची लगेच ओळख पटली. या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. दिलीप भुजबळ यांना देण्यात आली. दोन्ही मयतांच्या घरी ही माहिती पोहोचवण्यात आली. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शासकीय रूग्णालयात आणून ठेवले होते. वसीम पठाण आणि उमेश येरमे यांचे नातेवाईक एवढ्या रात्री शासकीय रुग्णालयात पोहोचले. त्यांनी दोघांचे मृतदेह पाहून एकच हंबरडा फोडला. दोघांच्याही शरीरावर शस्त्राच्या जखमा होत्या. या दोघांची हत्या कोणी केली? हा प्रश्न मयतांच्या नातेवाईकांना पडला. यावेळी वसीमची पत्नी निखत वसीम पठाण (रा. नेताजी नगर यवतमाळ) हिने पोलिसांना सांगितले की, एक महिना आधी नीरज वाघमारे यांच्या ऑफिसजवळ वसीम आणि अब्दुल यांच्यात वाद झाला होता, तेव्हा मी तिथे गेले असता नीरज वाघमारे यांनी मला धमकावले व तुझ्या पतीचा गेम होईल त्याला समजावून सांग अशी धमकी दिली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांना आरोपीचा सुराग लागला. गोपनीय माहिती काढली असता वसीम आणि अब्दुल रहेमान यांच्यात वैमनस्य होते अशी माहिती पोलिसांना मिळाली. वसीम या परिसरात दारु विक्रीचा व्यवसाय करत असल्यामुळे त्यांची परिसरात दहशत वाढली होती. तो अब्दुल रहेमान यांच्या मटण दुकानावर जाऊन दररोज मटण किंवा चिकन विकत घेतल्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ करायचा. तसेच त्याच्या गल्ल्यातील पैसे बळजबरीने हिसकावून घ्यायचा अशी माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अब्दुल रहेमान व त्याच्या मित्रांचा शोध घेतला असता सर्व जण घरातून बेपत्ता असल्याचे समजले. संशयित आरोपी घरात नसल्यामुळे पोलिसांचा संशय अधिकच बळावला आणि त्यांनी अब्दुल रहेमान याचा युद्धस्तरावर शोध घेतला. अब्दुलची सासरवाडी यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यात एका खेडेगावात असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाल्यामुळे पोलीस ताफा नेरच्या दिशेने निघाला आणि अब्दुलच्या सासऱ्याकडे पोलीस साध्या वेषात पोहोचले. पोलिसांची माहिती तंतोतंत खरी निघाली आणि याठिकाणी सर्व संशयित आरोपी पोलिसांना मिळून आले. पोलिसांनी या ठिकाणावरून नितीन पवार, नीलेश उईके, छोटु खा, नीरज वाघमारे आणि एका विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेतले. निखत वसीम पठाण हिच्या तक्रारीवरून यवतमाळ पोलिसांनी गुन्हा क्रमांक ९८७/२०२१ भादवि ३०२, ३४ नुसार गुन्हा दाखल केला. तिने दिलेल्या तक्रारीत म्हटले की, दि. १२ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळी सहा वाजता माझे पती घरी असतांना त्यांच्या मोबाईलवर एक फोन आला होता. मोबाईल फोनचा स्पीकर ऑन असल्यामुळे मला स्पष्ट आवाज ऐकू येत होता. अब्दुल रहेमान याने माझ्या पतीला फोन केला आणि आज आपण बाहेर बसू मी तुला जेवण देतो असे सांगितले. यानंतर वसीम पठाण यांनी आपला मित्र उमेश येरमे याला फोन करून बोलावले. दारुची पार्टी मिळत असल्यामुळे दोघेही अब्दुल रहेमानवर विश्वास ठेवून त्याच्यासोबत निघून गेले. त्यानंतर अब्दुल रहेमान आणि त्याच्या साथीदाराने वसीम पठाण, उमेश येरमे याचा खून केला असा संशय तिने व्यक्त केला होता. यासंदर्भात पोलीस तपासात अशी माहिती समोर आली की, हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर सर्व आरोपी आणि मृतक घराच्या दिशेने निघाले असता अब्दुलच्या गाडीवर मागे वसीम बसला तसेच अन्य व्यक्ती आपापल्या गाडीने निघाले. हॉटेलवर वाद झाल्यामुळे उमेश हा वाघापूर नाक्याजवळ असलेल्या पल्लवी लॉनपर्यंत चालत आला. तो तेथे जाऊन थांबला. काही वेळानंतर सर्व जण त्याला येतांना दिसले. पल्लवी लॉन्सजवळ पोहोचताच वसीमने उमेशला बघितले आणि अब्दुलची मानच मागून पकडली. अब्दुल घाबरला. वसीमला मारण्याचा प्लॅन होता, झाले उलटेच. अब्दुलची मान पकडल्यानंतर त्याचा मित्र नितीन पवारने हा प्रकार बघितला. नितीनला वाटले की वसीम आता अब्दुलचा जीव घेणार. त्याने विलंब न लावता आपल्या जवळील धारदार चाकू वसीमच्या पोटात खुपसला. हे पाहून भेदरलेल्या उमेशने घटनास्थळावरून पळ काढला. यावेळी अब्दुलच्या अन्य साथीदारानी उमेशचा पाठलाग करून पकडले. त्यांनी त्याला तेथे चाकूने भोसकले व त्याचा खून केला. जिल्हा पोलीस अधीक्षक दिलीप पाटील भुजबळ, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांनी घटनास्थळाला भेट दिली. पोलीस निरीक्षक मनोज केदारे, पी.एस.आय. खाडे, पी.एस.आय. चव्हाण, पी.एस.आय. भिकनवाड, ए.पी.आय. शेजव या अधिकाऱ्यांनी आरोपी शोधण्यासाठी पथके निर्माण करून संशयितांच्या मुसक्या आवळल्या. या हत्याकांडातील आरोपींची पोलिसांनी चौकशी केली असता अब्दुलने सांगितले की, वसीम पठाण याच्या दादागिरीला आम्ही कमालीचे कंटाळलो होतो. चिकन-मटणच्या दुकानावर येऊन दररोज फुकट चिकन घेऊन जाणे आणि काऊंटरमधून पैसे उचलून घेणे, यामुळे वसीमचा गेम केल्याची कबुली संशयितांनी दिली.

गुंडाच्या पत्नीचा विनयभंग केला...

पाटीलची बायको आवडू लागली होती. तो तिच्यावर पाळत ठेऊन होता. तो नेहमीच तिच्या मागे-पुढे करत असे. आपण कोणत्या मार्गाने चाललो आहोत याची जाणीव गंप्याला नव्हती. एक दिवस त्याची जणू नियतीच फिरली. कोणत्याही परिणामाचा विचार न करता गंप्या संजयच्या घरात शिरला, तेंव्हा संजय किंवा त्याचा मुलगा शुभम असे कोणीच घरात नव्हते. संजयची बायको घरात एकटीच होती. ही संधी साधून गंप्याने तिचा हात धरला. या प्रकाराने ती भेदरली. तिने विरोध केला, तरीही त्याने तिचा हात पकडून जवळ ओढण्याचा प्रयत्न केला. तिचा विनयभंग केला. तिने जास्त आरडाओरडा केल्यावर गंप्या पळ

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:15 PM Page 1

'जादुटोणा विरोधी कायद्याची' प्रभावी अंमलबजावणी करावी -अजित पवार

मुंबई/प्रतिनिधी

जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसार अंमलबजावणी समितीने कामकाजाला गती देवून राज्यात 'जादुटोणा विरोधी कायद्याची' प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मंत्रालयातील उपमुख्यमंत्री यांच्या समिती कक्षात 'जादुटोणा विरोधी कायदा' प्रभावीपणे राबविण्याबाबत बैठक पार पडली.या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते.यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे, वित्तीय सुधारणाचे प्रधान सचिव राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाच्या अप्पर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये, अतिरिक्त पोलीस महासंचालक राजेंद्र सिंग, समाजकल्याण विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, सहसचिव दिनेश डिंगळे, उपसचिव नियोजन भांडारकर, विधी व न्यायच्या उपसचिव सुप्रिया धावरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) गणेश रामदासी, जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार समितीचे सहअध्यक्ष प्रा.श्याम मानव, शशिकांत गमरे, मधुकर कांबळे यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले,नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांनी प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत २०१३ मध्ये हा अधिनियम संमत करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. राज्यात 'जादुटोणा विरोधी कायद्याची'प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी प्रभावीपणे काम करावे.

आजही अंधश्रध्देमुळे अनेक गरीब, असहाय्य लोकांची फसवणूक होत असते अशा लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे,जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसार अंमलबजावणी समितीचे गठन करण्याबाबत सामाजिक न्याय विभागाने कार्यवाही करावी.गृह विभागाने आलेल्या तक्रारींवर योग्य ती कार्यवाही करावी.प्रा.श्याम मानव यांनी केलेल्या सूचनांबाबत शासन सकारात्मक असून राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून सर्व निर्णय घेण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

जादुटोणा विरोधी कायद्याच्या समित्यांचे पुनर्गठन लवकरच करणार : धनंजय मुंडे

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे म्हणाले,जादूटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसार अंमलबजावणी समितीचे पुनर्गठन करण्यात येईल.या कायद्याची माहिती तसेच जनजागृती करणे तसेच जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार समितीचे सहअध्यक्ष प्रा. श्याम मानव यांच्याशी चर्चा करून त्यांनी विभागासंदर्भात मांडलेल्या मुद्यांबाबत कार्यवाही करण्याची ग्वाही यावेळी मंत्री श्री. मुंडे यांनी दिली. या कायद्याच्या प्रचारामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारा,मानवता जोपसणारा, समता -बंधुता-स्वातंत्र्य या मुल्यांना स्वीकारणारा समाज निर्माण होण्यास मदत होईल असेही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे म्हणाले. जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार समितीचे सहअध्यक्ष प्रा.श्याम मानव यांनी जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसार अंमलबजावणी समितीचे पुर्नगठन, या समितीने पहिल्या टप्प्यात केलेली कामे, समितीच्या कामकाजासाठी शासनाकडून वित्त, गृह, महसूल, सामाजिक न्याय विभाग, विधी व न्याय विभाग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या जबाबदाऱ्या या संदर्भात सविस्तर सूचना बैठकीत केल्या.

पडोळकरवाडी येथील दरोडा आणि खून घटनास्थळाला कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरिक्षक हिरेमठ यांची भेट

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

पडोळकरवाडी येथे दरोडेखोरांनी नकुशा कोंडीबा मदने या ६५ वर्षीय महिलेच्या अंगावरील दागिने ओरबडून घेवून तीचा खून केलेल्या घटनास्थळी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरिक्षक सुधीर हिरेमठ यांनी आज भेट देवून साक्षीदार तपासून घटनेमागची सखोल माहिती जाणून घेतली. दरम्यान या घटनेच्या तपासासाठी डी.वाय.एस.पी. मंगळवेढा व सोलापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग यांची विशेष पथके तयार केली असल्याचे सांगण्यात आले. यातील मयत नकुशा मदने यांची मुले ऊसतोडीला गेल्यामुळे त्या एका कुडाच्या खोलीत एकटयाच रहात होत्या. त्याचबरोबर त्यांचा शेळीपालन व्यवसाय होता. दि. ६ रोजी त्या रात्री ९.३० वा. जेवण करून झोपल्या होत्या. दि.७ च्या सकाळी ९.०० वा. शेळयांचा ओरडण्याचा मोठा आवाज येत असल्याने फिर्यादीची भावजय रत्नाबाई ह्या तेथे गेल्यानंतर घराचा दरवाजा बंद असलेला दिसला.त्यांनी दार उघडून आत पाहिले असता नकुशा यांच्या कानाजवळ रक्त आलेले दिसल्याने त्यांनी आक्रोश केला.हा आवाज ऐकून आजूबाजूचे लोक जमल्यावर त्यांनी पाहिले असता त्यांच्या अंगावरील दागिने ओरबडून घेवून गळा दाबून खून केल्याचे निदर्शनास आले.या घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेला आहे. मागील तीन वर्षापुर्वी सोड्डी येथेही दागिने ओरबडून एका वृध्द महिलेचा खूनाचा प्रकार घडला होता. तत्कालीन पोलिस अधिक्षक विरेश प्रभू यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून तात्काळ आरोपींना जेरबंद केले होते. पडोळकरवाडी येथील घटनेवरून सोड्डी घटनेची पुनरावृत्ती झाल्याची आठवण परिसरातील नागरिकांना आली. या घटनेचे वृत्त राज्यभर पसरले असून कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलिस महानिरिक्षक सुधीर हिरेमठ यांनी सदर घटनास्थळाला प्रत्यक्ष भेट देवून साक्षीदार तपासले. तसेच या घटनेबाबत पोलिस अधिकाऱ्यांना काही महत्वाच्या सूचनाही केल्या. यावेळी डी.वाय.एस.पी. राजश्री पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे आदी उपस्थित होते. या दरोडा व खूनाचा तपास करणे पोलिसांच्या दृष्टीने एक आव्हानात्मक असून यासाठी डी.वाय.एस.पी. मंगळवेढा-१ टिम, स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर-१ टिम, मंगळवेढा पोलिस स्टेशन-१ टिम अशा टिम तयार करण्यात आल्या असून या घटनेचा शोध घेण्यासाठी त्या कार्यरत झाल्या आहेत.

लग्न जमलेल्या सासरच्या मंडळींना खुश करण्यासाठी करीत होता चोऱ्या

५ कार, ५ बाईक आणि सोन्याचे दागिने हस्तगत

भिवंडी/प्रतिनिधी

पुढील महिन्यात बोहल्यावर चढणाऱ्या नवरदेव बनणाऱ्या अट्टल चोरट्याने आपल्या नव्या नात्यातील सासरच्या मंडळींना खुश करण्यसाठी घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक करण्यात शांतीनगर पोलिसांना यश मिळाले असून त्याच्या ताब्यातून तब्बल ५ कार, ५ बाईक एक मंगळसूत्र असा ६ लाख ३९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. भिवंडी शहरातील टेमघर परिसरात राहणारा शिवासिंग अमिरसिंग बावरी वय २० असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. तो अल्पवयीन असल्या पासून भुरट्या चोऱ्या करीत होता त्याच्यावर या पूर्वी ४ गुन्हे दाखल असतानाच शांतीनगर पोलिसांना गुप्त बातमीदारा कडून या आरोपीची माहिती मिळाल्यावर पोलीस पथकाने त्यास सापळा रचून अटक करून चौकशी केली असता त्याच्या ताब्यातून भिवंडी, कल्याण, डोंबिवली, कळवा येथून चोरलेल्या ५ कार, ५ बाईक व एक चैन स्नाचिंग अशा तब्बल ११ गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. पुढील महिन्यात लग्न असल्याने लग्नासाठी पैसे जमविणे व नव्या नातेसंबंधातील मंडळींना खुश करण्यासाठी त्याने घरफोडीचे गुन्हे केले असून कार चोरी करून तिचा उपयोग तो घरफोडी करण्यासाठी करीत होता अशी माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे.

संयम सेवाभावी संस्थेतर्फे प्रा.डॉ. रावसाहेब दोरवे व अनीता दोरवे यांचा सत्कार

लातूर/प्रतिनिधी

सेवानिवृत्तीला अवघे दोन वर्ष राहिले असताना नेट परीक्षा व पी.एचडी.पदवी संपादन करून महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यासमोर प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे यांनी निर्माण केला एक वेगळा आदर्श निर्माण केला त्याबद्दल त्यांचा आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अनीता दोरवे यांचा सत्कार संयम सेवाभावी संस्था, लातूर तर्फे नूकताच करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा ममता सत्यपाल भडके, सामाजिक कार्यकर्ते देविदास कांबळे (नांदेड), प्रा.डॉ.संजय गवई, नंदू काजापुरे, संयम गवई, सुमित भडके आणि सार्थक गवई यांची उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यांतील हंचनाळ (नदी वाडी) येथील मुळ रहिवासी, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर येथील माजी विद्यार्थी तथा जवाहरलाल समाजकार्य महाविद्यालय, नांदेड येथील ज्येष्ठ प्रा.रावसाहेब दोरवे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडची पी.एचडी. पदवी नुकतीच प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायतीची भूमिका-एक अभ्यास (संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयावर संशोधन केले असून त्यांना मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड येथील प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव यांचे संशोधक मार्गदर्शक तर सह-संशोधक मार्गदर्शक म्हणून स्वा.रा.ती.म.वि.नांदेड येथील सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक प्रोफेसर डॉ.घन:श्याम येळणे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर येथे १९८६ रोजी या वर्षात समाजकार्य पदवी तर सन १९८८ या वर्षात एम.एस.डब्ल्यू. हे कर्वे समाजसेवा संस्था, पुणे येथे पूर्ण केले त्यानंतर त्यांनी आशा केंद्र, पुनतांबा, जि.अहमदनगर येथे फिल्ड कॉर्डिनेटर म्हणून ४ वर्ष तर कासा संस्थेत ३ वर्ष फील्ड ऑफिसर म्हणून उल्लेखनीय सामाजिक कार्य केले आहे. तसेच त्यांनी सन १९९३च्या किल्लारी भूंकप मदत व पुनर्वसन कार्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदविता होता. त्यांची अध्यापनाची एकूण २४ वर्ष पूर्ण झाली असून सध्या ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, येथे समाजकार्य अभ्यास मंडळाचे निमंत्रित सदस्य म्हणून कार्यरत असून त्यांनी १५ वर्ष राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यक्रमाधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. सन १९९७ ते २०१२ या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार त्यांना प्राप्त झाला असून त्यांच्या मार्गदर्शनामूळे एका स्वयंसेवक विद्यार्थ्याला राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे एकूण ०६ पुरस्कार मिळाले आहे. त्यानी रासेयोमध्ये जिल्हा समन्वयक म्हणून तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे रासेयो सल्लागार समिती सदस्य महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये व्यक्तिगत जीवनापेक्षा सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व दिले त्यामुळेच त्यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून एकूण १० पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या उज्वल यशामध्ये त्यांच्या सुविद्य पत्नी अनिता दोरवे आणि चिरजीवांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले आहे त्यांना दोन चिरंजीव असून ते दोघेही उच्च विद्याविभूषित आहेत. त्यापैकी स्वप्नील दोरवे हा हैदराबाद येथील Piramal swasthya Management and Research Institute मध्ये समुपदेशक अधिकारी म्हणून कार्यरत असून दुसरा मुलगा वैभव दोरवे याने मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे दोन वर्ष प्रशिक्षण केल्यानंतर सध्या तो दिल्ली येथे कार्यरत आहे.

प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व स्वयंसेवी संस्था क्षेत्रातील अनुभव हा मोठा असून त्यांनी सेवानिवृत्तीला अवघे दीड ते दोन वर्ष उरले असताना सन २०१२ रोजी नेट परीक्षा उत्तीर्ण केली आणि आज त्यांना पी.एचडी.पदवी प्रदान करण्यात आली त्यामुळे त्यांनी समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या समोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे आहे याचा आपण सर्वांना सार्थ अभिमान आहे असे म्हणणे नक्कीच गौरवाचे ठरेल. त्यांना पी.एचडी. पदवी प्रदान झाल्याबद्दल त्यांचा नुकताच लातूर येथे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्रातील ५२ समाजकार्य महाविद्यालयातील सर्व संस्थाचालक, प्राचार्य, संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि माजी आजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी भरभरून हार्दिक शुभेच्छा दिल्या.

व्यापाऱ्याच्या खून प्रकरणी बाप-बेट्याला जन्मठेपेची शिक्षा

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापुरात आर्थिक व्यवहारात थकित असलेले पैसे मागितल्याच्या कारणावरून सोलापुरातील सत्यनारायण मदनलाल करवा या व्यापाऱ्याने हैद्राबाद येथील हनुमान घनश्याम शर्मा या व्यापाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळून खून केला याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश आर एन पांढरे यांनी सत्यनारायण करवा व त्याच्या मुलगा मनोज करवा यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. तसेच मयताच्या प्रत्येक वारसास एक लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, २१ जानेवारी २०१७ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास मयत हनुमान घनश्याम शर्मा हे त्यांचे एमसीएक्स व्यवहार यातील १५ लाख रुपये मागण्याकरिता आरोपी सत्यनारायण करवा यांच्या घरी गेले होते. त्यावेळी आरोपी सत्यनारायण करवा यांनी मी तुला ओळखत नाही, तू माझ्या घरात आलाच कसा, माझा काही संबंध नाही, तू येथून गेला नाहीस, तर माझा मुलगा पोलीस मेंबर आहे, त्याला सांगून तुझ्यावर केस करायला लावेल असे धमकावण्यात आले. त्यावर मयताने काहीतरी पैसे द्या, नाही तर मला मरावे लागेल, असे म्हणून सोबत नेलेली पेट्रोलची बाटली बाहेर काढली व स्वतःच्या अंगावर ओतून घेण्याचा प्रयत्न करु लागला. यावेळी मयत हनुमान याने एका हातात लायटर दाखवला. तेवढ्यात आरोपी व आरोपीचा मुलगा समोर आलेले आरोपी सत्यनारायण करवा यांनी हनुमान याला तू काय करतो? आम्ही तुला दाखवतो कसे मारायचे ते, असे म्हणून दोन्ही आरोपींनी मयताच्या हातातील पेट्रोलची बाटली घेऊन त्याच्या अंगावर ओतली व झोंबाझोंबी करत मयताच्या हातातील लायटर घेऊन मयतास पेटवून दिले. यावेळी मयत हनुमंत शर्मा ओरडत असताना त्याला विझवण्याचा प्रयत्न झाला. दरम्यान उपचाराकरिता त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचाराकरिता त्यास पुणे व त्यानंतर हैदराबाद येथे दाखल केले असता ३१ जानेवारी २०१७ रोजी उपचारादरम्यान हनुमान शर्मा यांचे मयत झाले. यातील आरोपीनी त्याच्या अंगावर पेट्रोल ओतून खून केला. तसेच आरोपीने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचा लॅपटॉप व मोबाईल यांची विल्हेवाट लावली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यात आली होती.

ॲड. प्रदीप सिंह राजपूत

न्यायालयात दोषारोपपत्र पाठवण्यात आली. सरकार पक्षाच्यावतीने जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत यांनी सात साक्षीदार तपासले वैद्यकीय पुरावे. परिस्थितीजन्य पुरावा व मयताचे तीन मृत्यूपूर्व जबाब या सर्व गोष्टी वरून सदर आरोपींनी त्याच्या अंगावर पेट्रोल ओतून खून केल्याचे निष्पन्न झाले. जिल्हा सरकारी वकील राजपूत यांनी केलेला हा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी सत्यनारायण करवा व त्याचा मुलगा मनोज करवा या दोघांना खुनाच्या आरोपाखाली दोषी ठरवले या प्रकरणात मयताच्या प्रत्येक वारसास नुकसान भरपाई म्हणून आरोपीकडून प्रत्येकी एक लाख रुपये देण्याचा आदेश पारित करण्यात आला. सदर मयतास पत्नी रूपा हनुमान शर्मा मुलगा अभिषेक व मुलगी सुस्मिता अशी तीन कायदेशीर

वारस असल्याने एकूण तीन लाख रुपये इतके नुकसान भरपाई आरोपींनी सदर मयताच्या वारसास द्यावी लागणार आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.एस. पाटील यांनी केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने वकील मिलिंद थोबडे यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल रफिक तांबोळी, अनुराधा गुत्तिकोंडा यांनी काम पाहिले.

वाड्यात आरोग्य शिबीर संपन्न

वाडा/प्रतिनिधी

सर्वसामान्य कुटुंबातील मुलाच्या वाढदिवसा निमित्त ग्रामीण भागात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून एक वेगळा पायंडा पाडला आहे. हा उपक्रम नक्कीच वाखाणण्या जोगा असल्याचे मत पालघर जिल्ह्या परिषद सदस्य भक्ती वलटे यांनी व्यक्त केले आहे. त्या आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी बोलत होत्या. तालुक्यातील कोणसई येथील मेघवाले पाड्यातील समाज गृह येथे कु. वीर प्रशांत पाटील याच्या सातव्या वाढदिवसा निमित्त रविवारी (दि.५डिसेंबर) मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरच्या आरोग्य शिबिरात पालघर जिल्ह्या परिषद सदस्या भक्ती वलटे, सामजिक कार्यकर्ते डॉ. भाई वलटे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका अध्यक्षा मृणाली नडगे, निवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष निहेश गायकवाड, निवा हॉस्पिटलच्या सर्वेसर्वा, स्त्री रोगतज्ञ डॉ. माधुरी कांबळे - गायकवाड, डॉ.गिरीष ठाकरे, वाडा पंचायत समितीचे माजी उपसभापती जगदीश पाटील, अबीटघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच दयानंद पाटील, आदी उपस्थित होते.

घरकुलाचे स्वप्नपूर्ण करणारे 'ग्रामविकास'चे महाआवास अभियान

मुंबई/प्रतिनिधी

राज्यातील गोरगरीबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण व्हावे, त्यांना पक्के व स्वत:च्या मालकी हक्काचे घर मिळावे यासाठी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी पुढाकार घेऊन राज्यात २० नोव्हेंबर २०२० पासून महाआवास अभियानाची सुरूवात केली. या पहिल्या टप्प्यात १२६० पेक्षा जास्त बहुमजली इमारती, ६३० पेक्षा जास्त गृहसंकुले तसेच ७५० घरकुल मार्ट सुरू करण्यात आले आहे. सोबतच ५० हजार ११२ भूमीहिन लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. एका अर्थाने महाआवास अभियानाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला. महाआवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यश पाहता दुसरा टप्पा दिनांक २० नोव्हेंबर २०२१ पासून सुरू झाला. यात ५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. अन्य राज्याच्या तुलनेत हे महाआवास अभियान अधिक सक्षम आणि गतिमानतेने पुढे नेण्याचा निर्धार करत या पूर्ण अभियानात ७ डिसेंबर २०२१ पर्यंत संपूर्ण राज्यात प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेच्या ९ लाख ८८ हजार ६९१ घरांकरिता मंजुरी देण्यात आली असून ७ लाख ४३ हजार ३२६ घरे पुर्ण झाली आहेत. दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ७ डिसेंबर २०२१ राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेतील १०७१ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे तर ४ हजार ६८४ घरे पूर्ण झाली आहेत. राज्य पुरस्कृत रमाई, शबरी, पारधी, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना अशा विविध योजनेमार्फत ४ लाख १९ हजार ८३३ घरांकरिता मंजुरी देण्यात आली असून दिनांक ७ डिसेंबर २०२१ पर्यंत २ लाख ९५ हजार ९४१ घरे पुर्ण झाली आहेत. २० नोव्हेंबर २०२१ ते ७ डिसेंबर २०२१ या महाआवास अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्य पुरस्कृत आवास योजनेतील १ हजार ९०२ घरे बांधण्यात आली आहे. उर्वरित घरे विहित मुदतीत पूर्णत्वाकडे जातील, असा विश्वास ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ.राजाराम दिघे यांनी व्यक्त केला आहे.

13 TO 19 DECEMBER 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/12/2021 9:16 PM Page 1

कर्जत भूमिअभिलेख कार्यालयातील अनागोंदी उजेडात!

छाननी लिपिकाला १० हजारांची लाच घेताना पकडले

कर्जत/धर्मानंद गायकवाड

रायगड जिल्ह्यातील कर्जत भूमिअभिलेख कार्यालयाचा अनोगोंदी कारभार उजेडात आला आहे, या कार्यालयातील छाननी लिपिक दत्ता जाधव यांना दहा हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी रंगेहाथ पकडले आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यांत खळबळ माजली आहे.

या बाबत मिळालेल्या माहीतीनुसार कर्जत तालुक्याती कैलास पेरणेकर यांनी आरवंद येथिल ७ गुंठे जमिन २५ ाक्टोबर रोजी शासकीय मोजणी केली होती. ही मोजणी झाल्यानंतर या मोजणीची क प्रतचा नकाशा मिळावी यासाठी पेरणेकर हे रोजच भूमिअभिलेख कार्यालयात हेलपांडे मारत होते. मात्र त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. तसेच या कार्यालयातील छाननी लिपिक दत्ता जाधव यांनी तर चक्क ही क प्रत देणेसाठी पेरणेकर यांच्याकडे रक्कम रुपये १० हजार रुपयाची मागणी केली. त्यामुळे दत्ता जाधव या लीपिकाने १० हजार रुपयांची मागणी केली असता पेरणेकर यांनी यबाबत अलिबाग येथे जावुन लाचलुचपत विभागाचा उपअधीक्षक सुषमा सोनावणे यांची भेट घेवुन तक्रार केली. अलिबाग डीवाएसपी सुषमा सोनवणे यांच्याकडे या लिपिकाची तक्रार झाल्यानंतर त्यांनी तात्काळ याची दखल घेतली. काल शुक्रवारी दुपारी कर्जतमधील भूमिअभिलेख कार्यालयात सापळा रचण्यात आला, आणि या भूमीअभिलेख लीपिकाला १० हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आले. छाणणी लिपिक दत्ता जाधव याला अटक करण्यात आली आली आहे. दरम्यान कर्जत भूमीअभिलेख कार्यालयाचा अनोगोंदी कारभार सुरू असुन या कारभाराला येथिल स्थानिक नागरीक कंटाळले आहेत. भूमीअभीलेख कार्यालयाचा मनमानी कारभारासोबतच येथे मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा तक्रारी मोठ्या प्रमाणावर होत असतानाच काल अलिबाग लाचलुचपत विभागाचा येथिल कारवाईने पुन्हा एकदा येथील भ्रष्टाचार उजेडात आला आहे. त्यामुळे लाचलुचपत विभागाचा कारवाईने येथील जनता सुखावली असल्याचे सांगणेत येत असुन आता येथिल कारभार सुधारते की कसे? याबाबत तर्क वितर्क लढविले जाते.

प्रदूषणकारी कंपन्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता-डॉ.अरुण सावंत

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यात विविध प्रकारच्या कंपन्या असून त्यापैकी बऱ्याचशा रासायनिक प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या आहेत, ज्या कंपन्यांमुळे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच पाणी प्रदूषण होऊन ग्रामीण भागातील शेतकरी, नागरिकांना त्रास होत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा कंपन्यांचा शोध घेऊन प्रशासनाने त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता असून वेळप्रसंगी आंदोलन करणार असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण सावंत यांनी केले. वाडा तालुक्यातील गांध्रे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते, ते पुढे म्हणाले की अंबिस्ते (बुद्रुक) गावात अवैधरित्या चालू असलेल्या जी.के.फाउंडर्स या कंपनीमधुन निघणारे केमिकल मिश्रीत सांडपाणी व धुरामुळे येथील ग्रामस्थांच्या शेतीचे व आरोग्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या बाबत अंबिस्ते ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली असता, मंडळाने देखील नोटीस दिली आहे तरीही या कंपनीचा मनमानी कारभार सुरूच आहे. शिसे व अल्युमिनियम या धातूवर प्रक्रिया करणाऱ्या वीस पेक्षा जास्त कंपन्या वाडा तालुक्यात असल्याची माहिती मिळाली असून या कंपन्यांतून पसरणाऱ्या धूर व धुळीतून शिसे हा धातू नागरिकांच्या रक्तात मिसळत असून त्याद्वारे चाळीसपेक्षा अधिक विकार उद्भवत आहेत, शिसे मिश्रित धूळ, धुरामुळे येणाऱ्या पिढीला देखील याचा त्रास होणार आहे. अंबिस्ते येथील कंपनीचा संदर्भ घेऊन अशा प्रकारच्या प्रदूषणकारी कपाण्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी प्रसार माध्यमातून केली आहे.

बाळासाहेब जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन!

अहमदपूर/फिरोज शेख

आमदार बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत गोताळा ता.अहमदपूर येथे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत भोसले व सुनेगाव (शेंद्री) शेनी या गावच्या सरपंच उषा जायभाये यांचे पती गोपीनाथ जायभाये यांच्या संकल्पनेतून ऊस तोड कामगारांना ब्लँकेट वाटप तसेच जावेदभाई बागवान यांच्या संकल्पनेतून सुखमनी वृद्धाश्रमात फळ वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित राहून ऊसतोड कामगारांना ब्लँकेट वाटप केले. तसेच फळ वाटप केले. हिवाळ्यात थंडी पासून संरक्षण व्हावे आणि त्यांना मायेची ऊब देण्याचा प्रयत्न म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. स्तुत्य असा उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करत आमदार बाबासाहेब पाटील यांनी आभार मानले. तसेच हजरत सय्यद अमीर अली दर्गा टेंभी पाटी येथे दर्गा देवस्थान चादर चढवत माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांना निरोगी उदंड आयुष्य लाभो अशी ही प्रार्थना केली. यावेळी राष्ट्रवादी ता.अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, मुकुंदराव देशमुख, शेतकी अधिकारी पी.एल मिटकर, राष्ट्रवादी युवक जिल्हा कार्यध्यक्ष प्रशांत भोसले, गोपीनाथ जायभाये, शरद चवंडा, राजकुमार रेड्डी, प्रशांत भोसले, शहराध्यक्ष अझहरभाई बागवान, शादुल पठाण सर,चंद्रशेखर भालेराव, माजी सभापती शिवाजीराव खांडेकर, बाबूभाई रुईकर, इलाही बागवान, गोलंदाज भाई, प्रवीण देशमुख, यशवंतराव टाळे, भाकरे, येदले ऊस पुरवठा अधिकारी गट पुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर डावळे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब बेडदे, नितीन गोरे, मुसने, जयंत देशमुख, टाळे साहेब, गुळवे दयानंद, डावळे, अभय मिरकले, प्रशांत भोसले, इलियास सय्यद, महेश देवणे, डॉ.फुजेल जहागिरदार, जावेद बागवान, अफरोज शेख, फेरोज शेख, पाशा मेजर, अशोक सोनकांबळे आदी उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना श्रमिक हक्क अभियानाचे अभिवादन!

देवणी/प्रतिनिधी

प्रती वर्षाप्रमाणे या ही वर्षी सिद्धार्थ नगर देवणी येथील श्रमीक हक्क अभीयाण कार्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पुजन पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे व नागेश जिवणे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच बरोबर पोलीस उपनिरीक्षक शेख, पो.हे.कॉ.विनायक कांबळे, प्रा.अनिल इंगोले, वसंतराव कांबळे, पांडुरंग कदम, शिवाभाऊ कांबळे, दिपक स्वामी, प्रकाश शिंदे, अविनाश कांबळे, सचिन मंगनाळे, भारत मुक्ती व बामसेफचे मुजिब तांबोळी, मुजिब शेख, अखिल शेख, आनंद सुर्यवंशी, राजीव जिवणे, प्रकाश गायकवाड, भिम गायकवाड, उमाकांत कांबळे,पद्माकर कांबळे,संजय जाधव नेकनाळकर, भगवान धोत्रे, बाबुराव बटनपुरकर, मारोती हुलसुरे, पांडु पतंगे, नंदुकुमार शिंदे, विलास गायकवाड, राम कांबळे, संतोष गायकवाड, त्याच बरोबर महिला आघाडीच्या प्रमुख अनिता ताई कांबळे, चंद्राबाई माने, ज्ञानेश्वर सुर्यवंशी, बालाजी टाळीकुटे, संदिप सुर्यवंशी व सचिन मंगनाळे यांच्यासह अन्य उपस्थितीने जाहीर अभिवादन करून सामुदायिक त्रिसरण पंचशील घेण्यात येऊन दर्दभरी गिताने व भाषणाने समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक व नियोजक दशरथ कांबळे, हुसेन धोत्रे, भिम पतंगे, संदिप सुर्यवंशी, पद्माकर कांबळे, रुपेश हुलसुरे यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वीत झाले.

देवणीत राष्ट्रवादी काँग्रेसचा परिवार संवाद कार्यकर्ता शिबीर

देवणी/प्रतिनिधी

देशाचे नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त देवणी येथे राष्ट्रवादी काँग्रेस वतीने परिवार सवांद कार्यकर्ता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राज्याचे राज्यमंत्री नामदार संजय बनसोडे उपस्थित तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष सूरज चव्हाण, राष्ट्रवादी जेष्ठ नेते जि.प.माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ, दत्ता महाराज बिजलगावकर, राष्ट्रवादिचे तालुका अध्यक्ष प्रा.अनिल इंगोले, तालुका कार्याध्यक्ष अनिल कांबळे, शहराध्यक्ष अमर मुर्के, इंद्रिस भातंब्रे, अंकुश गायकवाड, हसन मोमीन, हकीम बौडीवाले, जिल्हा उपाध्यक्ष अमरदिप बोरे, फेरोज शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, विवेक बिरादार, कार्याध्यक्ष संदीप पाटील, शहराध्यक्ष जितेंद्र शिवगे, ओबीसीचे तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे, गफुर खुरेशी, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेसचे जिल्हा संघटक उद्दव अचवले, सचिन गवठी सह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

भिवंडी महापालिकेची कोरोना लसीकरणासाठी धडक कारवाई

लसीचे दोन डोस न घेणाऱ्या कामगार, व्यापाऱ्यांची दुकाने, हॉटेल, बेकरी सील

भिवंडी/अभिजित हिरे

केंद्र आणि राज्य शासन कोरोना लसीकरणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करीत असताना भिवंडी शहरात मात्र कोरोना लसीकरणाला अल्प प्रतिसाद मिळत असल्याने महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी लसीकरण गांभीर्याने घेऊन शहरातील दुकाने, हॉटेल, विविध अस्थापना मध्ये काम करणाऱ्या कामगार, मालक, व्यापारी यांनी कोरोना लसीचे दोन डोस घेतले की नाही याची तपासणी करून दुकाने, हॉटेल, बेकरी सील करून दंड वसुल करून दोन्ही डोस घेण्यासाठी धडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे भिवंडी महापालिकेच्या एक ते पाचही प्रभागात असलेल्या अधिकाऱ्यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली असून प्रत्येक प्रभागात असलेली दुकाने, हॉटेल, बेकरी आणि विविध आस्थापना तपासन्यास सुरुवात केली असून प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रमांक २, प्रभाग क्रमांक, प्रभाग क्रमांक ३, प्रभाग क्रमांक ४, प्रभाग क्रमांक आणि प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या बाजारपेठा, गल्ली बोळात असलेली दुकाने, हॉटेल, बेकरी सह आस्थापना असलेल्या तब्बल २४ ठिकाणी चौकशी केली असताना व्यापारी, कामगारांनी कोरोना लस घेतली नसल्याचे आढळून आले. त्याच प्रमाणे मास्क लावले नसल्याचेही आढळून आल्याने महापालिका अधिकाऱ्यांनी दुकाने, हॉटेल, बेकरी सील करून कारवाई केली. त्यानंतर मालकांनी विनवणी करून कोरोना लस घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर प्रत्येक व्यक्तीप्रमाणे ५०० रुपये दंड आकारून विविध ठिकाणी आतापर्यंत ४४ हजार रुपयांचा दंड आकारून सर्व दंड लेखा विभागात जमा करण्यात आला आहे.

या धडक कारवाई मुळे दुकान, हॉटेल मालक, व्यापारी, कामगार यांच्यात चांगलीच खळबळ माजली असून त्यांची कोरोना लस घेण्यासाठी चांगलीच धावपळ सुरु झाली आहे. महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या धडक कारवाई मुळे व्यापारी, दुकान मालक, कामगार यांची चांगलीच घाबरगुंडी उडाली असून आपली दुकाने हॉटेल, व्यवसाय सुरु ठेवायचा असेल तर लस घेतल्याशिवाय पर्याय नसल्याने आता लसीकरणाला वेग येण्याची शक्यता वातावण्यात येत आहे.

देवणी नगरपंचायतीच्या १७ प्रभागांपैकी १३ प्रभागासाठी होणार निवडणूक

लोकसंख्येचा विचार करून दलीत मुस्लिम, लिंगायत समाजाला नगरपंचायतीमध्ये स्वीकृत नगरसेवक होण्याचा मान मिळणार का?

देवणी/शकिल मनियार

देवणी नगर पंचायतच्या निवडणुकित सध्या भाजप विरोधात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस ने आघाडी केली आहे तर नागेश जिवणे मित्रमंडळ स्वबळावर निवडून सर्वाशी सामना करण्याच्या भुमिकेत आहे. तसेच या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पार्टी, शिवसेना, एमआयएम, भारत मुक्ती मोर्चा, मनसेने ही काही प्रभागात नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत, तर येथे काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी-भाजपा व जिवणे मित्र मंडळात तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. मागील निवडणुकित काँग्रेस ५ भाजपा ८ नागेश जिवणे मित्रमंडळ ३ व एम आय एम १ असे नगरसेवक होते. पहिल्या टर्ममध्ये भाजपाचा नगराध्यक्ष व जिवणे मित्रमंडळाचा उपाध्यक्ष राहिला दुसऱ्या टर्ममध्येहि तोच फार्मुला कायम होता. देवणी नगर पंचायत निवडणुकीत एकुण १७ प्रभाग असुन यापैकी प्रभाग क्र ५,८,१०,११,हे प्रभाग नागरीकांचा मागास प्रवर्ग आहेत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार मागास प्रवर्ग असलेल्या जागेसाठी राज्य निवडणूक आयोगाने या चार प्रभागास निवडणूक स्थगती दिली आहे. उर्वरीत तेरा प्रभागासाठी निवडणुका होत आहे. १११ नामनिर्देशनापैकी छाननीत ३७ जनांचे नामनिर्देशन अर्ज अवैद्य ठरल्याने १३ जागेसाठी ७४ जण निवडणूक रिंगणात आहेत तरी यापैकी सोमवारी किती जण नामनिर्देशन अर्ज माघार घेणार यावर अंतीम उमेदवारीचे गणीत अवलंबून राहणार आहे.

दरम्यान गेल्यावेळेस नगर पंचायतीमध्ये स्विकृत नगरसेवक म्हणून काँग्रेस ने व भाजपाने प्रत्येकी एक-एक असे दोन मराठा समाजास पाच वर्षासाठी स्विकृत नगरसेवक होण्यासाठी संधी दिली होती. देवणी शहरात एकुण १०० टक्के लोकसंख्येपैकि खालील समाजातील लोकसंख्या अंदाजीत जवळपास लिंगायत समाजाची लोकसंख्या २५ टक्के आहे तर मुस्लीम समाजाची लोकसंख्या २५ टक्के आहे व दलीत समाजाची पण लोकसंख्या २५ टक्के आहे व उर्वरीत इतर समाजाची २५ टक्के लोकसंख्या आहे तरी यावेळेस तरी जिवणे मित्रमंडळ, काँग्रेस व भाजप पक्षाने वरीलप्रमाणे लोकसंख्येचा विचार करून दलीत,मुस्लीम,लिंगायत समाजास येणाऱ्या काळात तरी नगरपंचायतीमध्ये स्विकृत नगरसेवक बनवुन संधी देतील का असा प्रश्न सुजान नागरीकातुन बोलले जात आहे, हे मात्र येणारा काळच ठरवेल.

लग्न समारंभात चोरी करणाऱ्या टोळीला अटक

मीरा रोड/प्रतिनिधी

लग्न समारंभातील वऱ्हाडी मंडळींच्या धावपळ आणि गडबडीचा फायदा घेऊन लग्न समारंभातील सोन्या चांदीचे दागिने तसेच मोबाईल आणि इतर वस्तू पळवणाऱ्या टोळीतील पाच जणांना काशिमिरा पोलिसांनी अटक करून त्याच्याकडू २१०४१६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लग्न समारंभातील वस्तू चोरी होत असल्याच्या काही तक्रारी काशिमिरा पोलिसांकडे आल्या होत्या. त्यामुळे काशिमिरा पोलीस ठाण्याचे पोलीस या चोरांचा शोध घेत होते. अखेर ६ आणि ९ डिसेंबर रोजी पोलिसांनी यातील बाबू लखपत श्हीसोदिया (२१), आतिश अमर शिसोदिया (२३), निखील रवी शिसोदिया (१९), कारण महावीर सिंग (२३) आणि अन्य एक अशा पाच जणांना अटक करून त्यांच्याकडून २१०४१६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात ३०० गरम वजनाचे सोन्या चांदीचे दागिने वेगवेगळ्या कंपन्यांचे ५० हजारांचे ६ मोबाईल एक स्विफ्ट कार क्रमांक युपी ८० एफएफ ३८५२ या वस्तूंचा समावेश आहे. चौकशीत या टोळीने काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४, सांताक्रूझ, बांगुरनगर, इगतपुरी आणि सहार पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी एक असे मिळून ८ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. ही कारवाई परिमंडळ १ चे उपयुक्त अमित काळे, मीरा रोड विभागाचे सहा. पो. आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. संजय हजारे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, पो.उप नि. जावेद मुल्ला स.फौ.पी.जी. कावरे, पो.हवा. रुपेश तगाद, पो.न. सचिन हुले, विश्वनाथ जरग, पो.शी. हनुमंत तेर्वे, समीर यादव, सुधीर खोत, अनिल नगरे सनी सूर्यवंशी यांनी भाग घेतला.